**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२२
सुनावणी दिनांक : १५.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सचिन भाऊसाहेब काकडे,<br>रा. ३८-अ, उर्जानगर, सातारा परिसर, आयप्पा मंदिराजवळ, औरंगाबाद | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | | : उपस्थित<br>(प्रतिनिधी श्री. एम.बी.देशपांडे,उप कार्यकारी अभियंता सा.बां.(प.) वि. औरंगाबाद |

आज रोजी प्रत्यक्षात :
जन माहिती अधिकारी : उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)उपविभाग कन्नड, जि. औरंगाबाद : उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.११.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कन्नड यांच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक बांधकाम उपविभागाने सन २००७-०८, २००८-०९ व २००९-१० या

कालावधीमध्ये केलेल्या कामाचे अंदाजपत्रक, मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स, तालुका नकाशावर झालेल्या कामाची गावासह मार्क करुन मागितलेली माहिती, सदर काम इतर विभागाकडे असतील तर त्या विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, प्रत्येक रस्त्याचे डब्बर खदानीचे चार्ट व रस्त्याच्या खडीच्या जाडीचा चार्ट व रोजगार हमी योजनेमध्ये झालेल्या पूर्ण कामाची यादी, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता (पश्चिम), औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी कन्नड उपविभागाशी संबंधित माहिती मागितली असल्याने अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत सार्वजनिक बांधकाम, कन्नड पूर्व व पश्चिम या दोन उप विभागांना पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतर अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)विभाग, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १३.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०९.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर दिनांक १५.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील एकूण ८८३ पृष्ठांची विभागीय स्तरावरील माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१.०७.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित होते. आज दि. १५.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांनी आयोगासमोर केलेले युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या

प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील मोजमापपुस्तिकेच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो पुरविल्या नसल्याचे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये मान्य केले आहे. या (५१६ पृष्ठांच्या) प्रती त्यांनी आता स्वतः सोबत आणल्या आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागातर्फे केलेले काम तालुका नकाशावर मार्क करुन द्यावे अशी विनंती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे माहिती तयार करुन देऊन नंतर ती अर्जदारास देण्याची तरतूद नाही. या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देय होत असते. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी काम करीत असताना इतर कोणत्याही विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नव्हते. जन माहिती अधिकारी यांनी असे आज रोजी युक्तिवादामध्ये जरी कबूल केले असले तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती देताना या मुद्यावर माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे आता त्यांनी अपिलार्थीस त्यांनी आयोगास युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली माहिती या मुद्यासंदर्भात द्यावी. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये, रस्त्याच्या अंदाजपत्रकाच्या प्रती सोबत, प्रत्येक रस्त्याचे डब्बर खदानीचे चार्ट जोडलेले असतात, हे चार्ट जन माहिती अधिकारी यांनी रस्त्याच्या अंदाजपत्रकासोबत अपिलार्थीस दिले आहेत. परंतु रस्त्याच्या खडीच्या जाडीचा उतारा मात्र माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस पुरविलेला नाही. अपिलार्थीने या मुद्यावर मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल, किंवा जर असे कोणतेही चार्ट त्यांनी ठेवले नसतील तर तसे अपिलार्थीस कळवावे लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस पुरविल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला. तथापि सदरची माहिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्ण व रोजगार हमी योजनेअंतर्गत त्यांच्या कार्यालयातर्फे झालेल्या पूर्ण कामाची व अपूर्ण कामाची संख्या कळविल्याचे आयोगास आढळून येत आहे. या कामांची यादी त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्यावरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आता द्यावी लागेल.

अशा प्रकारे वरील परिच्छेदात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती आणि अपिलार्थीस देय असलेली माहिती याचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत स्पीड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थीस पुरवावयाची माहिती संकलीत करुन ठेवल्याचे व ती माहिती हस्तगत करण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २६.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर सांगितले व संदर्भित पत्राची प्रत आयोगाचे अवलोकनास्तव सादर केली. तथापि या पत्रानुसार अपिलार्थी माहिती हस्तगत करण्यासाठी त्यांचे कार्यालयात आले नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

उपरोक्त दोन सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या बाबींवरुन असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च् एकदा कार्यालयीन कामकाजाचा दिवस/कालावधी निश्चित करुन अपिलार्थीस माहिती हस्तगत करुन घेऊन जाण्याचे सूचित करणारे पत्र नोंदणीकृत टपालाने पाठवावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च् एकदा कार्यालयीन कामकाजाचा दिवस/कालावधी निश्चित करुन अपिलार्थीस माहिती हस्तगत करुन घेऊन जाण्याचे सूचित करणारे पत्र नोंदणीकृत टपालाने पाठवावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. सचिन भाऊसाहेब काकडे, रा. ३८-अ, उर्जानगर, सातारा परिसर, आयप्पा मंदिराजवळ, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) उपविभाग, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२४
सुनावणी दिनांक १५.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर,<br>संपादक - सा. सह्याद्रीचा आवाज, संपर्क कार्यालय -<br>राज झेरॉक्स, तहसील कार्यालयासमोर, मेन रोड<br>सिल्लोड, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सहशिक्षण संचालक कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय,<br>औरंगाबाद | | | :उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी : | सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद | :उपस्थित |
| त्रयस्थ पक्ष : | १) प्राचार्य- श्री. वाय. ए. बलांडे,<br>गजानन उच्च माध्यमिक विद्यालय, गोळेगाव | :उपस्थित |
| | २) श्री. देसले | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'गजानन उच्च माध्यमिक विद्यालय, गोळेगाव येथील शिक्षक श्री. देसले वाय. एफ. यांच्याविरुध्द आलेल्या तक्रारीवरुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळणेबाबत' या विषयावर दिनांक ०५.०१.२००९ ते ०५.०८.२००९

या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गजानन उच्च माध्यमिक विद्यालय, गोळेगाव येथील प्राचार्य वाय. ए. बलांडे यांच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील किंवा इतर कार्यालयातील अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली असल्यास त्या अधिकाऱ्याचे नाव आणि चौकशी अधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत व इतर अनुषंगिक मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन प्राचार्य, गजानन उच्च माध्यमिक विद्यालय, गोळेगाव यांच्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि यानंतर मूळ अर्जातील माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १९.०९.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी त्रयस्थ पक्ष श्री. देसले व जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दि. १५.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक

०५.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविली आहे. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीमध्ये सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०५.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदाराचे असते. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपेक्षित माहितीचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संदर्भित अर्ज प्राप्त झाल्यापासून त्यांच्या कार्यालयाने त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल म्हणजेच त्या अजासंदर्भात सादर करण्यात आलेली टिपणी व संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, अशी माहिती अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे, असे आयोगाचे मत आहे. अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशःव विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याचे व अपिलार्थीने ती स्वीकारण्यास तयार असल्याचे आज रोजी आयोगासमोर कबूल केले.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, सर्वसंमतीने निश्चित झाल्याप्रमाणे दि. २२.११.२०१० रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वा पर्यंत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी, असे आयोगातर्फे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, दि. २२.११.२०१० रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, संपादक - सा. सह्याद्रीचा आवाज, संपर्क कार्यालय - राज झेरॉक्स, तहसील कार्यालयासमोर, मेन रोड सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२१
सुनावणी दिनांक : १५.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मेटकर प्रकाश विठ्ठलराव,<br>रा.मरवाळी,ता.नायगाव (खै.),<br>ता.मुदखेड,जि.नांदेड. | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>जिल्हा परिषद शाळा, मरवाळी, ता.नायगाव (खै.),<br>जि.नांदेड | : प्रतिवादी | :अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,शिक्षण विभाग,<br>पंचायत समिती नायगाव (खै.), जि.नांदेड | | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेसंदर्भात दि. ०१.०१.२००५ ते ०६.०८.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण १५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तीस दिवसांच्या आत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०९.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर

जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १५.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, विशेषतः अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, नायगाव खै. यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,नायगाव (खै.) यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**

**दिनांक : १५.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मेटकर प्रकाश विठ्ठलराव,रा.मरवाळी,ता.नायगाव (खै.), ता.मुदखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जिल्हा परिषद शाळा, मरवाळी, ता.नायगाव (खै.),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,शिक्षण विभाग, पंचायत समिती, नायगाव (खै.),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२२
सुनावणी दिनांक : १५.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जयराम पोचीराम वने,<br>रा.राजवाडी, ता.मुदखेड,जि.नांदेड. | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>एकात्मिक बाल विकास सेवा योजना,मुदखेड,<br>जि.नांदेड. | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महिला व बालकल्याण विभाग,जिल्हा<br>परिषद,नांदेड | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी : | बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुदखेड, जि.नांदेड | :उपस्थित<br>( प्रतिनिधी - कु. एस.एस.शहाणे, वि.आ.(सांख्यिकी) |
| २.जन अपिलीय अधिकारी : | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) जि.प.नांदेड | :उपस्थित<br>( प्रतिनिधी - श्री. ए.एम.बेग, व.स.जि.प.नांदेड) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मुदखेड तालुक्यात असलेल्या अंगणवाडयांची गावाच्या नावासह यादी, त्यांनी दि. ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००९ पर्यंत वाटप केलेल्या साहित्याच्या बिलाच्या प्रती

आणि अंगणवाडीत शिकणाऱ्या मुलांना कोणकोणता खाऊ दिला जातो, याची बिलासह गावनिहाय माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तीस दिवसांच्या आत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी काय कार्यवाही केली, हे आयोगास कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १५.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी मागणी केलेली माहिती दि. ११.०९.२००९ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ अपिलार्थीस सदरची माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचपावती त्यांनी आयोगास दाखविली होती. त्याचप्रमाणे आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असाच युक्तिवाद केला.

वरील दोनही सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : १५.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. जयराम पोचीराम वने,रा.राजवाडी, पो.मेंडका,ता.मुदखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण),जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५९

सुनावणी दिनांक १५-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बन्सी उत्तमराव मोटे,<br>"श्रध्दा" सहयाद्री फॅब्रिकेटरसमोर,<br>संत नामदेवनगर, धानोरा रोड, बीड-४३१ १२२ | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद. | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>उस्मानाबाद | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "अर्हतारहित कनिष्ठ अभियंताना राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ स्तर) असा दर्जा देताना सब ओव्हरसियरचा सेवाकाळ धरणे बाबत", या विषयावर ऑक्टोबर, १९९० ते एप्रिल, १९९१ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांना दि. ०१.०४.१९८१ पासून शाखा अभियंत्याचा दर्जा देण्याबाबत प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना कोणत्या कारणामुळे सादर करण्यात आला नाही, प्रस्ताव सादर न करण्यात आलेल्या संबंधितांच्यावर काय कारवाई करण्यात आली व विभागीय आयुक्त कार्यालयास जर १९९० ते १९९१ च्या दरम्यान प्रस्ताव सादर केला असेल तर त्या प्रस्तावाची प्रत व या प्रस्तावावर आयुक्तांकडून जन माहिती अधिकारी यांना निर्णय आला, त्याची साक्षांकित प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६.०३.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती असमाधानकारक असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ३०.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १५-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही व दि. ०६.०४.२००९ रोजी चुकीची माहिती पुरविली. त्यांनी ऑक्टोबर,१९९० ते एप्रिल, १९९१ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी विभागीय आयुक्त कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात माहिती मागविली असता, त्यांनी परत अपिलार्थीस सन १९८१ सालाशी संबंधित माहिती पुरविली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सत्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे, अशी विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस प्रथमत: तत्कालीन जन माहिती अधिकारी,श्री. कुलकर्णी (सध्या कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग या पदावर कार्यरत) यांनी विहित मुदतीत कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे आयोगासमोर कबूल केले व त्यांनी अपिलार्थीस दि. ०६.०४.२००९ रोजी म्हणजे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर माहिती दिल्याचे आयोगास स्पष्ट केले आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्र. १ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालयास, अपिलार्थीस शाखा अभियंता दर्जा देण्याचा प्रस्ताव कोणत्या कारणामुळे सादर करण्यात आला नाही, अशी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येद्वारे स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्याबाबत कार्यवाही करावी, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाबाबतची अथवा कृतीबद्दलची स्पष्टीकरणे अर्जदारास करणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित कोणतीही माहिती देय होत नाही. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देय होत आहे. यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीस शाखा अभियंत्याचा दर्जा देण्याकरिता त्यांच्या सबओव्हरसियरच्या पदावरील सेवाकालावधीचा विचार करण्याबाबत त्यांच्या कार्यालयाने प्रस्ताव सादर न केल्याप्रकरणी कोणावरही जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही, त्यामुळे या प्रकरणी त्यांच्या कार्यालयातील कोणतेही कर्मचारी अद्यापपावेतो दोषी असल्याचे आढळून आले नाही व त्यांच्या कार्यालयाने कोणावरही यासंदर्भात कारवाई केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे हे स्पष्टीकरण पाहता, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात माहिती देताना त्यांच्या कार्यालयामार्फत कथित दोषी कर्मचाऱ्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, अशी माहिती अपिलार्थीस देणे संयुक्तिक राहिले असते, परंतु या मुद्यावर माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस "माहितीचा अधिकार २००५ मधील तरतुदीनुसार कारण देणे कायद्याच्या कक्षेमध्ये बसणारी बाब नाही, " अशी माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या आस्थापनाविषयक बाबीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना १९९० ते १९९१ या कालावधीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाची साक्षांकित प्रत मागितली होती. तथापि या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ५ ऑक्टोबर, १९८८ रोजी त्यांच्या आस्थापनाविषयक बाबीसंदर्भात त्यांनी औरंगाबाद विभागाच्या आयुक्तांना सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत दिली आहे.जर अपिलार्थीच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी १९९० ते १९९१ या कालावधीमध्ये कोणताही प्रस्ताव आयुक्तांना सादर केला नव्हता तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे वस्तुस्थिती अवगत करुन देणे या प्रकरणी उचित राहिले असते. परंतु अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे या प्रकरणी देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. ३ मध्ये मागणी केलेल्या माहितीशी संबंधित वस्तुस्थिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे कळवावी.

अशाप्रकारे वरील परिच्छेदात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या व अपिलार्थीस देय असलेल्या माहितीचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३

शी संबंधित वस्तुस्थिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती मिळाली नसल्याचे आयोगास सांगितले. १९९०-९१ या कालावधीशी संबंधित माहिती दिलेली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचा प्रस्ताव पाठविला नसल्याचे आयोगास सांगितले.

प्रकरणात दिनांक ३०-०६-२०१० रोजी झालेली सुनावणी, अर्जदाराने मागितलेली माहिती, सदर सुनावणीमध्ये आणि आज रोजी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मांडलेले त्यांचे म्हणणे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे आणि आयोगाने मागील सुनावणीच्या वेळी काढलेले निष्कर्ष पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही कारण ही माहिती उपलब्ध नाही व अशा प्रकारचे प्रस्ताव दिलेले नाहीत, तेव्हा टिपणी किंवा पत्रव्यवहाराच्या प्रती देता येत नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. त्यामुळे माहिती उपलब्ध नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना दोषी धरणे शक्य होत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्दयांबाबत जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या आत पुन्हा छाननी करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत वस्तुस्थिती अपिलार्थीस कळवावी, या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबंधित वस्तुस्थितीची पुन्हा छाननी करुन अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे कळवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १५-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बन्सी उत्तमराव मोटे,"श्रध्दा" सहयाद्री फॅब्रिकेटरसमोर, संत नामदेवनगर, धानोरा रोड, बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,उस्मानाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६०

सुनावणी दिनांक १५-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सोनवणे रावसाहेब सुखदेव,<br>रा. समर्थनगर, कविता पीठाची गिरणी, प्लॉट नं. ७५, जुना जालना | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ३०-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही नवीन गोष्टी आयोगास सांगितल्या नाहीत. तसेच आयोगाच्या दिनांक ३०-०६-२०१० रोजीच्या सुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, प्रकरणात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, इ. नुसार खालीलप्रमाणे गोष्टी दिसून येतात.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २८.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बदनापूर तालुक्यातील धामनगाव, चनेगाव, अन्वी, खामगाव, सागरवाडी येथे रोजगार हमी योजनेअंतर्गत व त्या व्यतिरिक्त इतर माध्यमातून झालेल्या दि. ०१.०१.२००८ ते ०१.०६.२००८ या कालावधीतील कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती व कुशल व अकुशल कामांचा तपशील, अशी माहिती मागितली होती. याच माहितीबरोबर अपिलार्थीने त्यांच्या दुसऱ्या मुद्याद्वारे झालेल्या कामाचे स्वरुप, एकूण मजूरांची संख्या, हजेरीपट क्रमांक, एकूण

मजूरांचा पगार याची व सर्व कामांची गावनिहाय माहिती देखील मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७०,०००/- इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयाशी कधीही संपर्क साधला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी ते तयार आहेत. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस देण्याकरिता तयार असलेली माहिती आयोगास दाखविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. ०५.०१.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. १३.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर) उपविभाग,जालना यांच्या दि. २२.१२.२००८ रोजीच्या पत्राचा संदर्भ देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७०,०००/-भरण्याचे त्यांना सूचित केले असता, या शुल्काचा भरणा अपिलार्थीने आजतागायत केला नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नव्हते.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घटनाक्रम ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशाप्रकारचे उत्तरदायित्त्व कसे पार पाडले आहे या संदर्भात त्यांनी कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही अथवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी देखील ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे कळविलेले शुल्क सर्वसाधारणपणे योग्य असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असेल तर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून या माहितीशी संबंधित अभिलेख्यांची पाहणी करु शकतात अथवा आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन ही माहिती प्राप्तही करुन घेऊ शकतात. तथापि या प्रकरणाच्या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची कधीही तयारी दर्शविली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७(५) मधील तरतुदीचा भंग केला असल्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. त्यांना आजपावेतो माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोनवणे रावसाहेब सुखदेव,रा.समर्थनगर, कविता पीठाची गिरणी, प्लॉट नं. ७५, जुना जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६२

सुनावणी दिनांक १५-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील केरबा माणिकराव,<br>रा. साखरा, पो.मुरुड अकोला, तालुका जिल्हा<br>लातूर-४१३ ५११. | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ३०-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळीही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व पाणीपुरवठा इत्यादी विभागामधील जिल्हास्तरावरील कामे मजूर संस्थांना देण्यासाठी शासनाच्या सहकार विभागाने स्थापन केलेल्या समितीचे अध्यक्ष हे जिल्हा उपनिबंधक असतात. त्यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा काम वाटप समितीची बैठक होऊन या बैठकीमध्ये कोणकोणत्या मजूर संस्थांना कोणते काम द्यावयाचे याचा निर्णय घेतला जातो. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, या समितीचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे असणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने ज्या मजूर संस्थेच्या संचालकांच्या बंधपत्राविषयी माहिती मागविली आहे त्या सर्व संस्थेच्या संचालकांची बंधपत्रे नोंदणी प्राधिकरण म्हणून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडेच उपलब्ध असावयास हवीत. अशा प्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडे उपलब्ध असणे संबंधित प्राधिकरणाच्या प्रचलित कार्यप्रणालीनुसार गरजेचे आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्त्व कशाप्रकारे पार पाडले आहे, याचा आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे उलगडा होत नाही. तसेच यासंदर्भात मौखिक युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये असलेली व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती, अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक १५-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पाटील केरबा माणिकराव,रा.साखरा,पो.मुरुड अकोला,ता.जि.लातूर-४१३ ५११.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११२

सुनावणी दिनांक १५-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले,<br>रा. गडगा, तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड. | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, नायगाव (खै.), तालुका नायगाव खै. जिल्हा नांदेड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), तालुका नायगाव खै. जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ३०-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अविनाश इटकापल्ले यांनी आयोगापुढे असे सादर केले आहे की, त्यांना बाकी सर्व माहिती मिळाली असून फक्त कार्डधारकांच्या नावाची यादी प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राचे अवलोकन करता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या कामकाजाकडे गंभीर दुर्लक्ष केलेले आहे असे प्रथमदर्शनी आयोगाच्या निदर्शनास आले आहे. सबब जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी अशी शिफारस करण्यात येत

आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे पुरवावी.

२. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, रा. गडगा, तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), तालुका नायगाव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७९

सुनावणी दिनांक १५-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हारसिंग कोंडीराम गुसिंगे,<br>रा. शेवगा, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>उप विभागीय माहिती अधिकारी, औरंगाबाद | | : |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ३०-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे आयोगासमोर सांगितले.

दिनांक ३०-०६-२०१० रोजीच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देतील असे ठरले होते. या प्रकरणाची आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. तेव्हा फक्त अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांना अद्यापही माहिती मिळाली नाही ही गंभीर बाब आज आयोगाच्या नजरेस आली त्यामुळे प्रकरणात सुनावणीची पुढील तारीख ठेवण्यात येत आहे. पुढील

सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

## आदेश

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सुनावणीस दिनांक १५-११-२०१० रोजी उपस्थित नाहीत म्हणून सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या दिवशी दोहोंनी तसेच तहसीलदार, औरंगाबाद (जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी नसल्यास) यांनी व्यक्तिशः उपस्थित रहावे.

**औरंगाबाद**

**दिनांक १५-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हारसिंग कोंडीराम गुसिंगे, रा. शेवगा, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९७
सुनावणी दिनांक १५.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ज्ञानेश्वर धनाजी पवार,<br>"त्रिवेणी", जिल्हा न्यायालयामागे,<br>केसरसिंगपुरा, औरंगाबाद | : अपिलार्थी | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद<br>विभाग, औरंगाबाद | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद<br>विभाग, औरंगाबाद | | :अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | वरिष्ठ लिपीक, कार्यालय<br>सहसंचालक (उच्च शिक्षण),<br>औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | :उपस्थित |
| त्रयस्थ पक्ष | : | श्री. राजाराम राठोड, श्री. एम. बी.<br>राठोड, श्री. अशोक चव्हाण, श्री.<br>पवार, श्री. गौर, श्री. शेख | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०१.२००८ रोजी द्वितीय अपील फेरसादर केलेले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.११.२००५ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वसंतराव नाईक महाविद्यालय यांच्यासंदर्भात दिनांक ०१.०४.९५ ते ३१.०३.०५ या कालावधीशी संबंधित काही

माहिती एकूण दोन मुद्यांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वरिष्ठ लेखा परीक्षक, उच्च शिक्षण यांनी सन १९९४-९५ आणि १९९५-९६ चे लेखा परीक्षण करीत असताना संबंधित संस्थेच्या अनुदानात कपात करण्याची सूचना दिली होती. तशाच प्रकारची माहिती दिनांक ०१.०४.९५ ते दिनांक ३१.०३.२००५ पर्यंत व त्रयस्थ पक्ष श्री. राजाराम राठोड, श्री. एम. बी. राठोड, श्री. अशोक चव्हाण, श्री. पवार, श्री. गौर, श्री. शेख या प्राचार्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून जो घरभाडे भत्ता जुलै, ऑगस्ट १९९७ ते दिनांक ३१.१०.२००५ पर्यंत देण्यात आला ती रक्कम - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०७.०१.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.०१.२००६ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित महाविद्यालयाकडून परस्पर घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर संबंधित महाविद्यालयाने अपिलार्थीस दिनांक ०५.०७.२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे दिनांक १०.०३.२००६ रोजी द्वितीय अपील सादर केले. तथापि यामध्ये औरंगाबाद खंडपीठास काही त्रुटी आढळून आल्याने त्यांनी अपिलार्थीस कळविले. या त्रुटी कळविल्यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे परत सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ३०.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी त्रयस्थ पक्ष श्री. राजाराम राठोड,श्री.एम.बी.राठोड,श्री. अशोक चव्हाण,श्री.पवार व श्री. गौर

अनुपस्थित होते व अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष श्री. शेख उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १५.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला होता. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित महाविद्यालयाने आवश्यक ती माहिती दिनांक ०५.०७.२००६ रोजी पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.०७.२०१० रोजी माहिती पुरविल्यासंदर्भात आयोगास सांगितले. तसेच अपिलार्थीनेही सदर पत्रान्वये माहिती मिळाल्याचे कबूल केले. तथापि सदर माहिती मिळण्यास विलंब झाल्याचे आयोगासमोर आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या बाबींवरुन असे निदर्शनास येत आहे की, अपिलार्थी यांच्या दि. ०८.११.२००५ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील द्वितीय अपील सुनावणीनंतर आयोगाच्या सूचनांनुसार दि.०६.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती पुरविली गेली आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणी करीत असताना अशाप्रकारे विलंब होणे, ही फार गंभीर बाब आहे. यासंदर्भात सचिव (उच्च शिक्षण) यांनी व्यक्तिशः लक्ष घालणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (उच्च शिक्षण) यांना सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणात माहिती देण्यास झालेला विलंब कोठे व कोणत्या कारणास्तव झाला आहे, याची आपले स्तरावर चौकशी व्हावी तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ ची प्रभावीपणे, तंतोतंत व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता आपले स्तरावरुन आपले अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांकरिता विशेष आदेश काढावेत.

वरील दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. सचिव (उच्च शिक्षण) यांना सूचित करण्यात करण्यात येत आहे की, या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यास झालेला विलंब कोठे व कोणत्या कारणास्तव झाला आहे, याची आपले स्तरावर चौकशी व्हावी तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ ची प्रभावीपणे, तंतोतंत व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता आपले स्तरावरुन आपले अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांकरिता विशेष आदेश काढावेत.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**
**दिनांक १५.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर धनाजी पवार, "त्रिवेणी", जिल्हा न्यायालयामागे, केसरसिंगपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (उच्च शिक्षण), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४१

सुनावणी दिनांक : १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर जलबाजी कांबळे सलगरेकर,<br>रा.वाघाळा, ता.जि.नांदेड | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे विभाग,नांदेड | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | | : उपस्थित<br>प्रतिनिधी -<br>श्री. एस. एस. हाशमी,<br>सहायक अधीक्षक<br>अभियंता, नांदेड<br>पाटबंधारे मंडळ,नांदेड |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी : | उप कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग,नांदेड | : उपस्थित |
| त्रयस्थ पक्ष : | श्री. बिरादार (का.अ.) | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. बिरादार यांना कार्यकारी अभियंता म्हणून पदभार स्वीकारल्यापासून मंजूरी दिलेल्या अंदाजपत्रकाची संख्या, करारनाम्याच्या व बिलाच्या प्रती, एजन्सीचे नाव, देयके अदा झालेला तपशील, सी.सी.ची उपविभागनिहाय झेरॉक्स प्रत, नांदेड पाटबंधारे विभागाअंतर्गत उपविभाग निहाय नांदेड, बारुळ,नायगाव,देगलूर,भोकर व किनवट

उपविभागाची माहिती, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती व अपिलार्थीने आपल्या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहून जाण्याचे सूचित केले व त्यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याचे त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे संदर्भ केल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार दि. ०२.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे व त्यातील १०० पृष्ठांपर्यंतच्या माहितीच्या प्रती विनामूल्य देण्याचा निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील तसेच आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याने त्यांनी जलसंपदा विभागाच्या दि. १२.०८.२००८ रोजीच्या आदेशास अनुसरुन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या दि. १९.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेली माहिती पाहून जाण्याचे आणि या माहितीतील त्यांना १०० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याचे कळविले होते. तथापि अपिलार्थी हे ती माहिती पाहण्यासाठी

त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

मागील व आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी त्या माहितीचे स्वरुप पाहता, ती माहिती अपिलार्थीस उघड करण्याचा त्रयस्थ पक्षास आणि जन माहिती अधिकाऱ्यास कोणताही प्रत्यवाय नसावा. ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) व ९ मधील तरतुदींचा भंग होणे संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना पूर्णतः द्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असून याचा सबळ पुरावा म्हणून त्यांनी नांदेड-वाघाळा महानगरपालिकेचे तसे प्रमाणपत्रही जोडले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मधुकर जलबाजी कांबळे सलगरेकर,द्वारा लुंबिनीवन नगर,वाघाळा,पो.सिडको, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,नांदेड पाटबंधारे विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४२

सुनावणी दिनांकः १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख अनवर शेख मन्नु,<br>रा. लेबर कॉलनी, घर नं. ४९, ब्लॉक नं. ४,<br>नांदेड | : अपिलार्थी | : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,<br>नांदेड | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय<br>व रुग्णालय, नांदेड | | : उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : मुख्य प्रशासकीय अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय<br>व रुग्णालय, नांदेड | : उपस्थित<br>(तत्कालीन व विद्यमान) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.१०.२००९ रोजी व्दितीय अपील फेरसादर केलेले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५.०१.२००७ ( अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेले वर्ष २००७ हे चुकीचे असून त्यांनी सन २००८ मध्ये मूळ अर्ज दाखल केला असल्याचे आयोगास अवगत केले)रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित १९९८ पासून ते ३१-१२-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे चतुर्थ श्रेणी कर्मचारी कायम करतेवेळी विभागीय पातळीवर वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची सत्यप्रत तसेच अनुकंपातत्वावर भरती करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांनी शिफारस केलेल्या पत्राच्या छायांकीत प्रती, धरणग्रस्तमधून भरती करण्यात आलेले धरणग्रस्ताचे प्रमाणपत्र व स्वातंत्र्य सैनिकांच्या जिल्हाधिकारी यांनी शिफारस केलेल्या पत्राच्या सत्यप्रती, कर्मचारी कायम करताना कोणत्या नियमाआधारे कायम करण्यात आले त्या नियमावलीच्या व अधिष्ठाता यांनी शेरा मारलेल्या सत्यप्रती, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २८७ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि यापुर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २८.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.  यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे दिनांक २७.०५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली.  तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरण प्रलंबित ठेवल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आजच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचा युक्तिवाद केला आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील दि. १५.०४.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य माहिती देण्यात यावी, असे आदेशित केले होते. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयामध्ये कार्यरत असूनही त्यांनी माहिती व्यक्तिशः स्वीकारली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य हस्तांतरित केली.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. शेख अनवर शेख मन्नु, रा. लेबर कॉलनी, घर नं. ४९, ब्लॉक नं. ४, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४४

सुनावणी दिनांक : १६.११.२०१०

१ श्री. योगेश लक्ष्मण लोमटे, : अपिलार्थी :उपस्थित
रा. गोवर्धनवाडी, पो. ढोकी, तालुका जिल्हा
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी :उपस्थित
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,
गोवर्धनवाडी, तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
उस्मानाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :
जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), : उपस्थित
पंचायत समिती, उस्मानाबाद

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध योजनांसंदर्भात सन २००४ ते दिनांक

०६.०८.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०७.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीतही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या पूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता दिनांक १५.१०.२००९ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाली असून अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती येणे बाकी आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी मुद्दाम टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी अशी त्यांनी युक्तिवादाच्या अखेरीस आयोगास विनंती केली होती. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५.१०.२००९ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ वगळता संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असा खुलासा केला

की, या मुद्यावरील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी गावातील स्वस्त धान्य दुकानदाराला पत्र दिले होते. तथापि या प्रकरणी स्वस्त धान्य दुकानदाराने उत्तर न दिल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, मागील सुनावणीमध्ये आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे,अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून ती संपूर्ण माहिती दि. ०३.०७.२०१० रोजी अपिलार्थीस दिली आहे. तसेच अपिलार्थीनेही त्यांना दि. ०३.०७.२०१० रोजी माहिती मिळाली असल्याचे व माहिती उशिरा मिळाली तरीही त्याबद्दल त्यांची काही तक्रार नसल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले.

वरील दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. योगेश लक्ष्मण लोमटे, रा. गोवर्धनवाडी, पो. ढोकी, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोवर्धनवाडी, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४५

सुनावणी दिनांक : १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मौलाना शे. मंजूर शे. शब्बीर पटेल,<br>जनता मार्केट, पॉवरलूमजवळ, वसमत, तालुका<br>वसमत, जिल्हा हिंगोली | : अपिलार्थी | : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, औढा (नागनाथ), जिल्हा<br>हिंगोली | : प्रतिवादी | :अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वसमत,<br>जिल्हा हिंगोली | | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये जून व जुलै २००९ मध्ये शासनाकडून जो ए. पी. एल. लाभार्थ्यासाठी गहू आला होता तो कोणकोणत्या दुकानदारास किती वाटप करण्यात आला

याची तपशीलवार माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही या कारणाने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे. तथापि ही माहिती त्यांच्याकडून घेऊन जाण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस ते ही माहिती पुरवू शकले नाहीत. यावेळी त्यांनी आयोगास अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे तयार असलेली माहिती दाखविली होती. सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले होते.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केलेली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे त्या अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे अशा प्रकारचे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०.०८.२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे व सदरची माहिती त्यांच्याकडून सशुल्क हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. या निर्णयाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविली आहे. यासंदर्भातील सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केला आहे. अशा प्रकारे या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर व ती माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य देऊ केल्यानंतरही अपिलार्थीने ती माहिती जन माहिती अधिकारी याच्या कार्यालयात उपस्थित राहून संबंधितांकडून हस्तगत करुन घेतली नाही. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी टाळल्याचे आयोगास आढळून येत नाही. उलट अपिलार्थीस त्यांनी सूचना देऊनही अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना अद्यापही माहिती मिळाली नसल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आता अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस हस्तांतरित करण्यासाठी त्यांच्याकडे तयार असलेली संपूर्ण माहिती त्यांनी,हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तगत करण्यास्तव उपलब्ध करुन

ठेवावी, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हस्तांतरित करण्यासाठी त्यांच्याकडे तयार असलेली संपूर्ण माहिती त्यांनी,हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तगत करण्यास्तव उपलब्ध करुन ठेवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. मौलाना शे. मंजूर शे. शब्बीर पटेल, जनता मार्केट, पॉवरलूमजवळ, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औढा (नागनाथ), तालुका औढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४६

सुनावणी दिनांक : १६.११.२०१०

१ श्री. बाळासाहेब म्हस्के, : अपिलार्थी :अनुपस्थित
रा. राहूलनगर, रेल्वे स्टेशनजवळ,
विनर बेकरीसमोर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनसंरक्षक, वन विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
वनसंरक्षक, वन विभाग कार्यालय, औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : मुख्य लेखापाल, वन संरक्षक कार्यालय,वनविभाग, औरंगाबाद :उपस्थित

जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा वन संरक्षक, वन विभाग, औरंगाबाद यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व वन क्षेत्रपाल यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २००८

-०९ या वर्षासाठी प्राप्त झालेला निधी त्यांनी कोण कोणत्या कामावर खर्च केला व कोणत्या हजेरी पत्रकावर खर्च केला त्या हजेरी पत्रकाचा क्रमांक व दिनांक, कामाचे नाव, गावाचे नाव, वन क्षेत्रपाल यांचे नाव, अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी, वन संरक्षक यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे, त्यांनी या माहितीशी संबंधित ज्या वन क्षेत्रपालाकडे उपलब्ध असते त्या वन क्षेत्रपाल औरंगाबाद, गंगापूर, सिल्लोड, वैजापूर, खुलताबाद प्रादेशिक व रोहयो यांच्याकडे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत दिनांक २१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली.

तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७-०८-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी दिनांक ०७-०९-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०९-२००९ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे आढळल्यावरुन अपिलार्थीने दिनांक १२-१०-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याशी पत्राद्वारे संपर्क साधला असता, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-१०-२००९ रोजीच्या पत्राद्वारे 'http:www.Nrega.Nic.in' या संकेत स्थळावरुन अपिलार्थीस माहिती घेण्याचे सूचित केले. परंतु यानंतरही अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३.०७.२०१० रोजी घेण्यात आली. त्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून न पुरविली गेलेली माहिती याचे विश्लेषण करुन आयोगाने असे सूचित केले होते की, अद्यापपावेतो अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेला रोजगार हमी योजनेवरील खर्च त्यांनी ज्या हजेरी पत्रकाद्वारे केला आहे त्या हजेरी पत्रकाचा क्रमांक व वन क्षेत्रपालाची नावे, ही माहिती प्राप्त होणे बाकी आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांनी अपिलार्थीस द्यावयाची उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, मागील दि. ०३.०७.२०१० रोजीच्या सुनावणीच्यावेळी आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार उर्वरित माहिती अपिलार्थीस त्यांनी दि. ०९.०७.२०१० रोजी व्यक्तिशः दिलेली आहे. ती माहिती अपिलार्थीने स्वीकारलेली आहे. याबाबतची पोचपावती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केली.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असताना, अपिलार्थीस ही माहिती देण्याचे टाळून त्यांना प्रदीर्घ कालावधीसाठी अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मर्यादित होते की, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना

फारसे कष्ट घ्यावे लागेल असते, किंवा त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री मोठ्या प्रमाणात वळवावी लागली असती, अशा प्रकारची कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, वन संरक्षक कार्यालय, औरंगाबाद यांची विलंबाबाबत चौकशी करावी व आवश्यक ती पुढील कार्यवाही योजावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, वन संरक्षक कार्यालय, वन विभाग, औरंगाबाद यांची विलंबाबाबत चौकशी करावी व आवश्यक पुढील कार्यवाही योजावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब म्हस्के, रा. राहूलनगर, रेल्वे स्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, वन संरक्षक कार्यालय, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४८
सुनावणी दिनांक : १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अरुण नागनाथराव गिरी,<br>रा. ९८/१ , स्वातंत्र्यसैनिक कॉलनी, परभणी | : अपिलार्थी | : उपस्थित |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय<br>आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी : | अव्वल कारकुन (विकास योजना), नगर परिषद, परभणी | : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी : | मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वातंत्र्यसैनिकांना लिजवर देण्यात आलेल्या

भूखंडाच्या विक्रीबाबत एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसाधारण टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १०.०९.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (विकास योजना), नगर परिषद, परभणी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१.१०.२००९ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती खोटी व चुकीची असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी श्रीमती सुवर्णा दिवाण या आयोगासमोर उपस्थित होत्या.प्रकरणात आज दिनांक १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी श्रीमती सुवर्णा दिवाण यांनी अपिलार्थीस दिनांक ३१.१०.२००९ रोजी संपूर्ण माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी आहे.

आजच्या सुनावणीच्यावेळी संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली व

अद्यापि प्राप्त व्हावयाची माहिती यासंदर्भात असे आढळून आले आहे की, मुद्दा क्र. १ च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे.

मुद्दा क्र.२ च्या संदर्भात अपिलार्थीस दिलेले उत्तर संदिग्ध आहे. यासंदर्भात ठराव पारीत करण्यापूर्वी तयार केलेल्या टिपणीची प्रत व पारीत केलेल्या ठरावाची प्रत अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

मुद्दा क्र.३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, बेकायदेशीर खरेदी-विक्री झालेल्या अ-हस्तांतरणीय भूखंडांच्यासंदर्भात संबंधित भूखंडधारकांना नोटीस देण्यात आल्या आहेत, असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि नोटीसेसच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आता द्याव्या लागतील.

मुद्दा क्र.४ च्या संदर्भात स्वातंत्र्यसैनिकांना देण्यात आलेल्या व भूखंडामध्ये झालेला फेरफार बेकायदेशीर असल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि त्यासंदर्भात त्यांच्याकडील नस्तीवर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे आवश्यक आहे.

मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधित प्रकरणात जबाबदारी निश्चित झाली असेल, चौकशी झाली असेल किंवा चालू असेल तर त्या संदर्भात चौकशी आदेशाच्या प्रती व टिपणीच्या प्रती, अशी माहिती अपिलार्थीस देणे आवश्यक आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त परिच्छेदात केलेल्या विश्लेषणानुसार त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्देनिहाय संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आज नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : १६.११.२०१० राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण नागनाथराव गिरी, रा. ९८/१ , स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (विकास योजना), नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५०
सुनावणी दिनांक : १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. माधव निवृत्ती वानखेडे,<br>रा.परभणी. | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२,परभणी | : प्रतिवादी | :उपस्थित<br>(प्रतिनिधी : उपकार्यकारी अभियंता जा.पा.विभाग-२,परभणी) |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण<br>औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन अपिलीय अधिकारी | : सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ११.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागातंर्गत सन १९८४-८५ मध्ये जायकवाडी धरणावरची

कामे संपली, या सबबीखाली सेवेतून कपात केलेल्यांपैकी किती कामगारांना सेवेत सामावून घेण्यात आले, किती कामगारांची सेवा सलग करण्याची राहिली व सेवा सलग करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या विभागामार्फत काय कार्यवाही केली, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीने त्यांना माहिती न मिळाल्यामुळे,अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १९.०९.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१०.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.१०.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली व माहिती प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीची पोचसही घेतली. तथापि माहिती प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती.यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. या प्रकरणाची आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्रथमतः दि. ०७.१०.२००९ रोजी व नंतर दि. २३.१०.२००९ रोजी व्यक्तिशः पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडे माहिती प्राप्त झाल्याबद्दलची दिलेली पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे सूचित केले होते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील "राहिलेल्या

कामगाराच्या सेवा सलग करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात आली", या मुद्यावर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस त्यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाने वेळेत वरिष्ठ कार्यालयास सादर केलेला पत्रव्यवहार संबंधित संचयिकेत उपलब्ध आहे, असे अपिलार्थीस कळविले. तथापि या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने या मुद्यावर मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती द्यावी लागेल. त्यामुळे मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित केले होते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील ज्या कामगारांच्या सेवा सलग करावयाच्या राहिलेल्या होत्या, त्यांच्या सेवा सलग करण्याबाबत त्यांच्या कार्यालयाने वरिष्ठ कार्यालयाशी दि. ११.०८.२००९ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे त्यांनी दि. १२.०७.२०१० रोजी उर्वरित माहिती दिलेली आहे. त्यासंदर्भातील त्यांच्याकडील नस्तीवर उपलब्ध असलेली अपिलार्थीची पोचसही जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अवलोकनास्तव सादर केली.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव निवृत्ती वानखेडे,रा.जायकवाडी वसाहत,कारेगाव नाका रोड,ता.जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५१

सुनावणी दिनांकः १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती जयश्री पि.दिनकरराव देशमुख,<br>रा.झरी, ता.जि.परभणी | : अपिलार्थी | : उपस्थित |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा.),<br>जिल्हा परिषद, परभणी | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा,<br>कक्ष अधिकारी शिक्षण विभाग(प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, परभणी | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी | : | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, परभणी | :अनुपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, परभणी | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.११.२००९ रोजीच्या अर्जाने द्वितीय अपील फेरसादर केले आहे. ते आयोगास दि. ०६.११.२००९६ रोजी प्राप्त झाले आहे.आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'परभणी जिल्हयातील शिक्षण विभागातील सर्व शिक्षकांच्या प्रतिनियुक्ती आदेश क्र. १०७४/०९ दि. ०२.०३.२००९ नोंद रद्द करण्यात आली होती. 'या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामध्ये ज्या शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या रद्द होऊनही त्यांना अद्यापपावेतो कार्यमुक्त केले नाही, अशा शिक्षकांची संपूर्ण नावे, कार्यरत शाळा, सेवा अधिगृहित/प्रतिनियुक्त केलेली शाळा, कोणत्या दिनांकापासून ते कोणत्या दिनांकापर्यंत कोणत्या कारणासाठी व कोणत्या आदेशान्वये प्रतिनियुक्ती केली व ज्या शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या रद्द होऊनही त्यांना कार्यमुक्त करण्यात आले नाही,अशा शिक्षकांचे संपूर्ण नाव,कार्यरत शाळा,प्रतिनियुक्ती केलेली शाळा,कार्यालय,कोणत्या दिनांकापासून ते कोणत्या दिनांकापर्यंत कोणाच्या आदेशान्वये व कोणत्या कारणासाठी त्यांना ठेवण्यात आले, याची सविस्तर माहिती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यामार्फत मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या पदावर नुकतेच रुजू झाले असून, त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीवरुन अपिलार्थीस दि. १४.०८.२००९ रोजी ही माहिती पोस्टाने पाठविली आहे, असे त्यांना आढळून आले आहे.अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती पुरविली याची आयोगाने त्यांना विचारणा केली असता, सदर माहिती त्यांच्याकडे आता उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

मागील सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने दिलेल्या आदेशानुसार व आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचा पुरावा म्हणून जन माहिती अधिकारी यांनी मागील सुनावणीच्या वेळी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीचा दि. १४.०८.२००९ रोजीचा उतारा आयोगास सादर केला होता. परंतु अपिलार्थीस त्यांनी कोणती माहिती पुरविली, हे ते आयोगास सांगू शकले नव्हते. केवळ जावक नोंदवहीवर अपिलार्थीचे नाव आणि विषय याची नोंद आहे, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याचा कोणताही निष्कर्ष काढता येणे शक्य नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पाठवावी. या आदेशाचे अनुपालन संबंधितांकडून तंतोतंत होईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांनी पहावे.

या प्रकरणी केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.०८.२००९ रोजी माहिती पुरविल्याचे गृहित धरले तरीही अपिलार्थीच्या दि. २३.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जो प्रतिसाद दि. २२.०७.२००९ रोजी अगर तत्पूर्वी देणे अभिप्रेत होते, तो प्रतिसाद त्यांनी दि. १४.०८.२००९ रोजी म्हणजेच २३ दिवसांच्या विलंबाने दिलेला आहे.अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अशाप्रकारे विलंबाने प्रतिसाद देऊन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी कुडे (सध्या निलंबित) यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी,श्री. शिवाजी कुडे आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी,श्री. शिवाजी कुडे यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २३.०६.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास एकूण २३ दिवसांच्या विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल व अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण २३ दिवसांसाठी रु.५,७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या आदेशाची प्रत श्री. शिवाजी कुडे, तत्कालीन उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.परभणी (सध्या निलंबित)यांना पोहोचविण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांची वैयक्तिक राहील.

त्याचप्रमाणे या प्रकरणी असे आढळून आले आहे की, या प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे दखल न घेऊन याद्वारे अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे निःसंशयपणे स्पष्ट होत आहे.याची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी यांनी स्वतंत्रपणे घ्यावी, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी,श्री. शिवाजी कुडे (सध्या निलंबित) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.५,७५०/-/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्रीमती जयश्री पि.दिनकरराव देशमुख,रा.झरी, ता.जि.परभणी-४३१ ५४०.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५२
सुनावणी दिनांक : १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. स.मंजूर स.खुर्शीद अली,<br>रा.अर्धापूर, जि.नांदेड | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत<br>कार्यालय,अर्धापूर, जि.नांदेड | : प्रतिवादी | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा,<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,अर्धापूर | | |

आज रोजी प्रत्यक्षातः

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती,अर्धापूर :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे.आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते.जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी अपिलार्थीस दि. ०३.१०.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविल्याचा पुरावा आयोगास सादर केला. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीने त्यांना दिलेली पोचसही देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २२.०९.२००९ रोजी निर्णय देऊन त्यांच्या कार्यालयातील पत्र क्र. १७२७ ने त्यांनी

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय अपिलार्थीस पोस्टाने कळविल्याचे आयोगास अवगत केले.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित केले होते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या ग्रामपंचायतीच्या खाते क्र. १२३ शी संबंधित पासबुकाच्या दि. ०१.०१.२००९ ते ३०.०६.२००९ या कालावधीतील उताऱ्याची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आज रोजी सुनावणीच्यावेळी अवगत केले. तथापि आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे याबाबतची खात्री आयोगास करता आली नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. स.मंजूर स.खुर्शीद अली,रा.बरकतपूरा,अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती,अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२५
सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जनार्दन दत्तात्रय साळी,<br>रा. एस. टी. कॉलनी, नाईकवाडा, स्वयंवर मंगल कार्यालयाजवळ, जालना | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, जिल्हा जालना | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड, जिल्हा जालना | : | उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, जिल्हा जालना | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाअंतर्गत येणारे मंडळे (निरीक्षक) यामध्ये कार्यरत असणारे कर्मचारी, त्यांचे पदनाम आणि या पदावर हे कर्मचारी कधी पासून कार्यरत आहेत, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०८-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १००/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १४-०९-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून, ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. तथापि अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीप्रमाणे या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून या टप्प्यावर अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग झाला असल्यामुळे आता त्यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीच्या मागणीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने व विनामूल्य पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आयोगाच्या दिनांक ०१-०७-२०१० रोजीच्या सुनावणीतील निर्देशानुसार त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-१०-२०१० रोजी स्पीड पोस्टाने माहिती पाठविली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांना माहिती मिळाली किंवा कसे याबाबतचा खुलासा होणे शक्य झाले नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी स्पीड पोस्टाने पाठविलेली माहिती अपिलार्थीस मिळाल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जनार्दन दत्तात्रय साळी, रा. एस. टी. कॉलनी, नाईक वाडा, स्वयंवर मंगल कार्यालयाजवळ, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२६

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बोधले गणेश शिवाजीराव,<br>शिल्प निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा,<br>जिल्हा लातूर | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा,<br>जिल्हा लातूर | | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | वरिष्ठ लिपीक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या नियंत्रणाखालील सन २००६-०७, २००७-०८, २००८-०९ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयातील डिझेल व यांत्रिकी या विभागातर्फे जे साहित्य, हत्यारे व जी यंत्रे खरेदी केली आहेत, त्याच्या बिलाच्या प्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२/- प्रतिपृष्ठ या दराने भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४.०८.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. म्हणून त्यांनी दि. ०६.०७.२००९ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा प्रतिपृष्ठ दर देखील कळविला, परंतु या नंतरही अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः संपर्क न साधल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली ते अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशाप्रकारचे उत्तरदायित्त्व पार पाडल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. याउलट अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दाखविली असताना देखील अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीस आजही या माहितीची आवश्यकता असेल तर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सशुल्क घेऊ शकतात. अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेण्याची तयारी नसल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलार्थी हे त्यांच्याच कार्यालयात शिल्प निदेशक या पदावर कार्यरत आहेत. त्यांना व्यक्तिशः माहिती हवी होती. माहिती उपलब्ध आहे तथापि अपिलार्थीने ती व्यक्तिशः उपलब्ध करुन घेण्यामध्ये स्वारस्य दाखविले नाही.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तारीख व वेळ

निश्चित करुन तसे पत्र द्यावे म्हणजे त्या दिवशी अपिलार्थी व्यक्तिशः आणि विनामूल्य माहिती प्राप्त करु शकतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, शिल्प निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२७

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महादप्पा शिवलिंग आप्पा बोधने,<br>रा. प्रतापनगर, नांदखेड रोड,<br>परभणी | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>परभणी | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक धर्मादाय आयुक्त, परभणी | : | अनुपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष : १. मराठवाडा सेवा संघ | | अनुपस्थित |
| | २. श्री. लक्ष्मण अनंत खरवडकर | | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, मराठवाडा सेवा संघ आणि श्री. लक्ष्मण अनंतराव खरवडकर यांच्यासंदर्भात एकूण २६ मुद्यांद्वारे वेगवेगळी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज संबंधित संस्थेकडे पाठविला व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याचे संबंधित संस्थेच्या अध्यक्षांना

सूचित केले. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने यापूर्वीच दि. १५.०६.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०७.२००९ रोजी त्यांचे आदेश पारित केले. या आदेशामध्ये अपिलार्थीच्या अर्जामधील प्रत्येक मुद्याचा परामर्ष घेऊन त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना कशी प्राप्त करुन घेता येईल, याचे मार्गदर्शन केले. तथापि या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना दिलेल्या नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर देखील अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अध्यक्ष, मराठवाडा सेवा संघ हे उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस संबंधित संस्थेने दि. २४.०७.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २६ मुद्यांद्वारे त्रयस्थ पक्ष मराठवाडा सेवा संघ व श्री. लक्ष्मण खरवडकर यांच्यासंदर्भात माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीने ज्या संस्थेविषयी माहिती मागविली आहे त्या संस्थेची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात 'एफ ५८६ (पी.)' या क्रमांकाने झाली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी

केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २, मुद्दा क्र. ५अंशत:(-----जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत सन २००४ ते २००८ या कालावधीत संबंधित संस्थेची किती वेळा तपासणी केली,तपासणीची तारीख आणि तपासणी करणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम, ही माहिती वगळता उर्वरित माहिती), मुद्दा क्र.६ मधील अंशतः भाग- जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित संस्थेने किती चेंज रिपोर्ट व कोणकोणत्या ठरावानुसार केव्हा केव्हा प्राप्त झाले व त्या चेंज रिपोर्टवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, हा भाग वगळता, मुद्दा क्र.१०, मुद्दा क्र.२२,मुद्दा क्र.२३, व २४ वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपाची माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याइतपतच प्रक्रिया सीमित आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे व त्यांचे वैयक्तिक अभिप्राय विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे उत्तर देणे वा स्वतःचे अभिप्राय अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा यामध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील या परिच्छेदामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र. १,२,५ अंशतः, ६ अंशतः, मुद्दा क्र. १०,२२,२३ व २४ हे मुद्दे वगळता उर्वरित मुद्दयांवरील माहिती, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी वर स्पष्ट केल्याप्रमाणे विसंगत असल्यामुळे देय होणार नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय आहे ती

माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आता द्यावी लागेल. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी मूळात अपिलार्थीच्या दि. ११.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देण्याची त्यांची कृती गैर व चुकीची आहे हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. १८.०७.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता, या निर्णयामध्ये त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाऱ्यास माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश दिले नाहीत. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कशी माहिती हस्तगत करावी, याचे मार्गदर्शन केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपिलावर अशाप्रकारे निर्णय घेण्याची कृती चुकीची आहे, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस देय असलेली माहिती याचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र १,२,५ अंशत:,६ अंशत:,१०,२२,२३,२४ या मुद्यांशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी या नात्याने सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून माहिती प्राप्त होणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली माहिती, नियंत्रक आणि नोंदणी प्राधिकरण म्हणून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडेच उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामार्फत पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे आणि याचबरोबर अपिलार्थीच्या दि. ११.०४.२००९ रोजीच्या

मूळ अर्जावर अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही कार्यवाही न केल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे व इत:पर त्यांनी अशाप्रकारची पुनरावृत्ती टाळावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती तयार आहे ती अपिलार्थीस देण्यात येईल.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली आणि त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १६-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलींग आप्पा बोधने, रा. प्रतापनगर, नांदखेड रोड, परभणी
२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२८

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. गिरी सुभान दत्तात्रय,<br>रा. घर नं. २३, सहयोगनगर, रिजनल वर्कशॉपजवळ,<br>नांदेड-४३१६०२ | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरी,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरी,<br>जिल्हा नांदेड | | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, उमरी, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या या प्रकरणीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही व त्यांना निर्णय न दिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे अपील सादर केले असून या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. उमरी येथील श्री. सय्यद चांदशेठ यांचे घर ते नगर परिषदेच्या जागेपर्यंत केलेल्या आर.सी.सी.नालीच्या बांधकामासंदर्भात एकूण १२ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उमरी नगर परिषदेने सय्य्द चाँदशेठ यांचे घर ते नगर परिषद कार्यालयाच्या चौकापर्यंत केलेल्या आर.सी.सी.कव्हर नाली/नाली

बांधकाम या कामाच्या पूर्ण संचिकेची प्रत, या नालीच्या बांधकामाच्या जागेच्या मालकाचे नाव, नालीची जागा नगर पालिकेच्या मालकीची असेल तर प्रॉपर्टी रजिस्टरमध्ये असलेल्या नोंदीच्या पुराव्याची प्रत,हे काम करण्यासाठी मंजूरी देण्यात आलेल्या सर्वसाधारण/विशेष बैठकीच्या ठरावाच्या प्रती, या नाली बांधकामास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या संचिकेची प्रत, नाली बांधकामास दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या संचिकेची प्रत, स्पर्धात्मक तक्त्यासह ठेकेदारासाठी जाहीर प्रगटन काढलेल्या संचिकेची प्रत, या कामाची निविदा काढलेल्या संचिकेची प्रत, त्यातील कमी दराची निविदा स्वीकारली असल्याबाबतच्या ठरावासह, ठेकेदाराशी कामाबाबत केलेल्या करारनाम्याची प्रत, नाली बांधकामाच्या मोजमापपुस्तिकेची प्रत, नाली बांधकामाच्या कार्यारंभ आदेशाची प्रत, नाली बांधकामाच्या कामात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनास/मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या अहवालाची व तक्रारीची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१०.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही आदेश पारित केला नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती अपिलार्थीस न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ०१-०७-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी मुख्याधिकारी, नगर परिषद,उमरी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे, त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले. अपिलार्थीस माहिती पुरविल्यापृष्ठयर्थ आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केलेल्या दि. ०४.०२.२०१० रोजीच्या पत्राची प्रत त्यांनी पुरावा म्हणून सादर केली.

वरील घटनाक्रम, मुख्याधिकारी,नगर परिषद,उमरी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, उमरी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत पोस्टाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्यापृष्ठयर्थ पुरावा म्हणून सादर केलेल्या त्यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. ०४.०२.२०१० रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, सदरचे पत्र अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात नसल्यामुळे त्यांचा, अपिलार्थीस या प्रकरणी माहिती दिल्याचा दावा, आयोग अमान्य करीत आहे. या पत्रामध्ये देखील जन माहिती अधिकारी यांनी फक्त या कामाच्या अंदापत्रकाची प्रत दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण १२ मुद्यांद्वारे माहिती मागूनही अपिलार्थीस कोणत्याही मुद्यावर जन माहिती अधिकारी माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्याकडे कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रतीची मागणी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. याचाच अर्थ अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली नाही. या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोघांनीही अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व त्यावरील अपील अर्जास कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना संबंधित मुख्याधिकारी, नगर परिषद यांच्या या प्रकरणातील बेजबाबदार वर्तनाची नोंद त्यांनी त्यांच्या स्तरावर घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,नगर परिषद, उमरी,श्री. चंद्रकांत धोंडीबा पटकुटवार यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,श्री. चंद्रकांत धोंडीबा पटकुटवार यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगापुढे आलेल्या गोष्टी व उपलब्ध कागदपत्रावर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली आणि त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, श्री. चंद्रकांत धोंडीबा पटकुटवार यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गिरी सुभान दत्तात्रय, रा.घर नं. २३, सहयोगनगर, रिजनल वर्कशॉपजवळ, नांदेड-४३१६०२

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, उमरी, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरी, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३०

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल,<br>ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : प्रथम लिपीक, कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक | : प्रतिनिधी- श्री. श्रीकांत कुलकर्णी, कनिष्ठ लिपीक- उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : उप कार्यकारी अभियंता, कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागाअंतर्गत केलेल्या कामाच्या प्रलंबीत बिलासंदर्भात दिनांक ०१ एप्रिल २००८ ते १० जून २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८२० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात किंवा शासकीय कोषागारात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व परिणामी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील कोणतीही माहिती ज्ञात न होऊ शकल्यामुळे त्यांनी अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासदर्भात दिनांक १२-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१०-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हा निर्णय देऊन एका महिन्याचा कालावधी व्यपगत झाल्या-नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक २९-१०-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचे पत्र पाठविल्याबाबतच्या पुराव्याची आयोगाने त्यांच्याकडे मागणी केली असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाशिक येथील कार्यालयाने अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहिती पाठविताना त्यांनी ते पत्र सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्यामार्फत पाठविणे त्यांना मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्या आदेशानुसार अनिवार्य होते. त्यामुळे त्यांचे दिनांक ०९-०७-२००९ रोजीचे पत्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्यामार्फत अपिलार्थीस पाठविण्यात आले होते. परंतु त्यांच्या कार्यालयाने सदरचे पत्र अपिलार्थीस पाठविले किंवा कसे हे त्यांना संबंधितांकडून ज्ञात होऊ शकले नाही. परिणामी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक १९-०६-२०१० रोजी नोंदणीकृत डाकेव्दारे विनामूल्य पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी आयोगाकडे दिनांक १७-११-२००९ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक १९-०६-२०१० रोजी संपूर्ण माहिती नोंदणीकृत डाकेव्दारे पुरविली आहे. नोंदणीकृत डाकेव्दारे माहिती पाठविल्या-संदर्भातील आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी

यांनी आयोगास सादर केला आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही अभिप्राय त्यांनी आयोगाकडे आजतागायत वेगळ्या अर्जाव्दारे दिलेले नाहीत अथवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थितही नाहीत. हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे. तथापि या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी कोणताही कालावधी जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केला नव्हता. अशा प्रकारचे मोघम स्वरुपाचे आदेश देण्याचे उप कार्यकारी अभियंता यांनी इत:पर टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस वेळेत माहिती प्राप्त न होण्याकरिता जबाबदार असलेले तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पवार, कार्यालयीन अधीक्षक, कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक हे आता नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली आहे परंतु मिळालेली माहिती ही अपूर्ण आहे.

दिनांक ०१-०७-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आलेल्या गोष्टी, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, आयोगाने काढलेले निष्कर्ष आणि या सुनावणीमध्ये दिलेले तोंडी आदेश, तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद आणि अपिलार्थीस मिळालेल्या माहितीचा उहापोह करण्यात आला त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विस्तृत माहिती दिली आहे असे आयोगास आढळून आले आहे. तरी अपिलार्थीने प्राप्त माहितीचा अभ्यास करुन अतिरिक्त माहितीची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे माहिती अधिकार कायद्याचा वापर करावा.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक

बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३१

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेंगरेलू लक्ष्मण फकीरा,<br>रा. इंदिरानगर, अर्धापूर, तालुका अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत<br>कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांच्या दिनांक २९-०५-२००९ रोजीच्या क्रमांक ९६३/०९ या पत्रामध्ये सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती" अशी माहिती पोस्टाने मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २५-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे

आयोगास आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ३०-०१-२०१० रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक ३०-०१-२०१० रोजी प्राप्त झाल्याबद्दलची अपिलार्थीची पोचही आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-०१-२०१० रोजी, अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर दिली गेली असल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानतर दिनांक ०८-०९-२००९ रोजी अपिलार्थीस पत्र देऊन सर्व्हेक्षणाचे काम चालू आहे सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यावर माहिती देण्यात येईल असे कळविले होते. त्याप्रमाणे दिनांक ३०-०१-२०१० रोजी अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः माहिती दिली आहे जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०९-२००९ रोजीच्या पत्रान्वये सर्व्हेक्षण करुन अपिलार्थीस माहिती द्यावी असे कळविले होते. सर्व्हेक्षणाचे काम चालू आहे हे त्यांना ज्ञात होते. याबाबतचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास सादर केला आहे. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या पत्राप्रमाणे जन माहिती अधिका-याने सर्व्हेक्षण करुन लाभार्थ्यांच्या नावाची माहिती एकत्रित करुन व्यवस्थितरित्या अपिलार्थीस दिल्याचे आढळून आले आहे. त्याची प्रतही आज आयोगापुढे सादर करण्यात आली आहे. त्यामुळे जन माहिती अधिका-यास माहिती पुरविण्यासाठी जरी वेळ लागला असला तरी त्यांनी सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करुन ही माहिती अपिलार्थीस दिली आहे असे आयोगाच्या लक्षात आले आहे. त्यामुळे झालेला विलंब संयुक्तीक ठरत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-११-२०१०**

प्रत,

१ श्री. शेंगरेलू लक्ष्मण फकीरा, रा. इंदिरानगर, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३३

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल अण्णासाहेब आघाव,<br>ह. मु. श्री. अंभोरे यांचा वाडा, नितीन प्रोव्हिजनसमोर, नागेश्वरवाडी, औरंगाबाद | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी, परतूर,<br>तालुका परतूर, जिल्हा जालना | : प्रतिवादी : | प्रतिनिधी- श्री. बालाजी शेवाळे, तहसीलदार, मंठा, जिल्हा जालना- उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : | उपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष : श्री. विष्णू नाजूकराव आघाव | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०५-२००८ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी निकाल दिला याची माहिती, अर्जदार व गैरअर्जदार यांनी काय खुलासा केला व फेरफार क्रमांक २५९ हा कोणत्या गटाचा मंजूर केला, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील त्यांच्या दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी

संबंधित माहिती ही तलाठी, सजा वझर सरकटे, तालुका मंठा यांच्याशी संबंधित असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व त्यांच्याकडील माहितीसाठी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदा-मध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील माहितीकरिता ४० रुपये इतके शुल्क भरण्याचे देखील सूचित केले होते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर केलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या-कडे व्यक्तिशः संपर्क न साधताही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके त्यांना कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्याबाबतचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही किंवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपविभागीय अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांनी यापूर्वीच त्यांना दिनांक १६-१०-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाव्दारे उपलब्ध करुन दिल्याचे आयोगास आढळून आले होते. हे पाहता आवश्यक त्या कागदपत्राच्या उपलब्धतेअभावी व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले असता असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ ची माहिती दिलेली आहे हे अपिलार्थीस मान्य आहे. तथापि मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती प्रलंबीत आहे. सबब अपिलार्थी यांनी दिनांक २३-११-२०१० रोजी सकाळी ११-०० ते सायं. ०५-०० या वेळेत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुनिल अण्णासाहेब आघाव, ह. मु. व्दारा, श्री. अंभोरे यांचा वाडा, नितीन प्रोव्हिजन समोर, नागेश्वरवाडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३६

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मरकड अंकुशराव दादाराव,<br>मु. पो. गोंदी, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोंदी, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोंदी, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित प्रचंड प्रमाणात व्याप्ती असलेली काही माहिती एकूण ६ मुद्यांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १०-०८-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात

प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२००९ रोजी निर्णय देऊन या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत माहिती देण्याचे कबूल केल्याने, अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतर अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी फक्त अर्धीच माहिती देऊ केली होती व संपूर्ण माहिती देऊ केली नव्हती असा युक्तिवाद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांची आई कॅन्सरने गेली वर्षभर आजारी असून आईच्या दुखण्यामुळे त्यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती देता येणे शक्य झाले नाही. तथापि आता ते अपिलार्थीस संपूर्ण माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी अंदाजे दिड महिन्याच्या आत प्रथम प्रतिसाद दिला होता. तथापि संबंधित कागदपत्रे त्यांनी आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी आणले नाहीत, असेही त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत जरी असली तरीही तिची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती १५ दिवसाच्या आत देण्यासाठी आयोगासमोर तयारी दर्शविली आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाने पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकतात. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी व त्याची पोच घेऊन ती रेकॉर्डवर ठेवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मरकड अंकुशराव दादाराव, मु. पो. गोंदी, तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोंदी, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३८

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विनोद गोपीनाथ कोरके,<br>रा. विटखेडा, पैठण रोड, औरंगाबाद | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी ,<br>लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे मंडळ,<br>औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००७ व २००८ या आर्थिक वर्षात गाडयाच्या इंधनासाठी व दुरुस्तीसाठी खर्च झालेली रक्कम, याच्याविषयी वाहननिहाय माहिती व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील वाहन क्र. एमझेडए-७३४ व एम.एच २५-६२७१ या दोन वाहनांच्या दि. २००७-२००८ या वर्षाच्या लॉगबुकच्या छायाप्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२९.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे कळविले व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संदर्भातील माहिती, सदरचे वाहन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून इतरत्र

हस्तांतरित झाले असल्यामुळे त्या वाहनाच्या लॉगबुकच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९.१०.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे ज्या वाहनांच्या संदर्भात माहिती मागितली आहे, ती वाहने 'वाल्मी' या जलसंपदा विभागाच्या संस्थेकडे हस्तांतरित केली आहेत. तरीही त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयातर्फे वेगवेगळया वाहनांची वाहननिहाय माहिती त्यांच्या कार्यालयात तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न राहिल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांवर माहिती मागविली आहे. त्यापैकी एका मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती नाकारताना त्यांनी सदरची वाहने इतरत्र हस्तांतरित झाली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरवता येत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.सार्वजनिक प्राधिकरणामध्ये एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे वाहनाचे हस्तांतरण होत असताना त्या वाहनाचे लॉगबुक हे देखील वाहनाबरोबरच हस्तांतरित होत असते. त्यामुळे अपिलार्थीने या मुद्यावर मागणी केलेली माहिती, सदरचे वाहन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने ज्या प्राधिकरणाकडे हस्तांतरित केले होते, त्या प्राधिकरणाकडे त्या वाहनाचे लॉगबुक असणे अभिप्रेत आहे.त्यामुळे अशावेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत 'वाल्मी' या संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे पाठवून, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती.

तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न केल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत, असे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, आता 'वाल्मी' या संस्थेकडून अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, आयोगाने दिनांक ०२-०७-२०१० रोजीच्या सुनावणीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे व अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-०७-२०१० रोजीच्या पत्रान्वये व्यक्तिशः उपस्थित राहून विनामूल्य माहिती घेऊन जाण्याचे कळविले आहे. याबाबतची अपिलार्थीची पोच रेकॉर्डवर उपलब्ध आहे परंतु अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत.

वरील बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस पुन्हा माहिती घेऊन जाण्यासाठी वेळ व दिनांक निश्चित करुन त्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विनोद गोपीनाथ कोरके, रा. विटखेडा, पैठण रोड, औरंगाबाद.

२.	जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३९

सुनावणी दिनांक १६-११-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. आहाद मोहियोद्दीन (हुमेर)<br>व श्री. उजेफ पठाण, रा.आहाद मंजील, नेहरुनगर,<br>कटकटगेट, औरंगाबाद | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>महानगरपालिका, औरंगाबाद | | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | मुख्य अग्निशमन अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | उप आयुक्त (सि), महानगरपालिका, औरंगाबाद | : | प्रतिनिधी- श्री. प्र. द. पाठक, सहायक प्रशासकीय अधिकारी- उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने "दि.२४.०८.२००९ रोजी दिलेल्या निवेदनामध्ये कटकटगेटजवळील नाल्यावरील भंगारचे गोडाऊन उठविणेबाबत देण्यात आलेल्या सदरील निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली, याची माहिती देणे" ही आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, वरील परिच्छेदात नमूद केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीने परत दि. १२.१०.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार महानगरपालिका,औरंगाबादच्या अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या दोनही अर्जांना महानगरपालिकेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दिनांक १६-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २९.०८.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे हे उत्तरदायित्त्व कशाप्रकारे पार पाडले, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या आणि संबंधितांच्या उपस्थिती-अभावी कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २४.०८.२००९ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०८.२००९ रोजीच्या अर्जामधील संदर्भित विषयावर वेगवेगळया प्राधिकरणांशी दि. २९.०८.२००९ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि यासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती, ही होय. जर या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या दि. २४.०८.२००९ रोजीच्या संदर्भित अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसेल तर त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस तसे कळविणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे त्यांच्याकडे तयार आहेत. सदर माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः देण्यास तयार आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत डाकेने पत्र पाठवून माहिती देण्यासाठी तारीख व वेळ निश्चित करुन अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याचे कळवावे. तसेच सदर माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पुरवावी.

**औरंगाबाद** — **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १६-११-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आहाद मोहियोद्दीन (हुमेर) व श्री. उजेफ पठाण, रा.आहाद मंजील, नेहरुनगर, कटकटगेट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य अग्निशमन अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सि.), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४७

सुनावणी दिनांकः १६.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजय सुर्यभान तांदळे,<br>रा. एन-६, ई-१४/१४, संभाजी कॉलनी, सिडको,<br>औरंगाबाद | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>श्री. व्यंकटेश प्राथमिक शाळा, औरंगाबाद | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | | : उपस्थित<br>(प्रतिनिधी - श्री पवार बी. बी. अधीक्षक, प्राथमिक शिक्षण विभाग, जि.प.औ.बाद |

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, श्री. व्यंकटेश प्राथमिक शाळा, औरंगाबाद :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १६.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली होती. तसेच संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने, त्यांची शाळा कायमस्वरुपी विनाअनुदानित

असल्याचे आयोगास अवगत केले होते व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेच्या म्हणण्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीने दुजोरा दिला होता.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांनी आयोगासमोर पुनश्च् प्रतिपादन केले की, विचाराधीन शाळेस कोणतेही शासकीय अनुदान प्राप्त होत नाही.

मागील व आजच्या सुनावणीच्यावेळी संबंधितांनी केलेला युक्तिवाद लक्षात घेता, आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक ०४.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये ज्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडे त्यांच्या शाळेविषयी माहिती मागविली आहे ते मुख्याध्यापक हे कायमस्वरुपी विनाअनुदानित शाळेमध्ये मुख्याध्यापक या पदावर कार्यरत आहेत. सध्या या शाळेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनुदान दिले जात नाही. त्यामुळे ही शाळा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीप्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणाच्या' व्याख्येच्या व्याप्तीत येत नाही. परिणामी या शाळेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत नसल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.११.२०१०**

**( दी. बा.देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. विजय सुर्यभान तांदळे, रा. एन-६, ई-१४/१४, संभाजी कॉलनी, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. व्यंकटेश प्राथमिक शाळा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६६

सुनावणी दिनांकः १८.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गिरी सुभान दत्तात्रय,<br>घर नं. २३, सहयोगनगर, रिजनल वर्क<br>शॉपजवळ, नांदेड | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उमरी,<br>तालुका उमरी, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उमरी,<br>तालुका उमरी, जिल्हा नांदेड | | :अनुपस्थित |

**आज रोजी प्रत्यक्षात :**

जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील मोंढा भागामधील आरक्षित जमिनीच्या / भूखंडाच्या संचिकेसंदर्भात एकूण १७ मुद्यांद्वारे व्यापक व्याप्ती असलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०.१०.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही आणि अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १२.१०.२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ती पाहून जाण्याचे व त्यातील आवश्यक त्या माहितीच्या प्रती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आजच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस सुरुवातीला त्यांच्या कार्यालयातील माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले होते, तथापि तदनंतर दिनांक ०४.०२.२०१० रोजी अपिलार्थीस टपालाद्वारे माहिती पुरविली आहे.

मागील व आजच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या

प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०२.२०१० रोजी म्हणजेच अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक १३.११.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर खाजगी कुरिअरमार्फत पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अथवा प्राप्त माहितीवर तोंडी भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच यासंदर्भात त्यांना नगरपरिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आयोगाकडे त्यांचे कोणतेही अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे समाधान झाले असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. गिरी सुभान दत्तात्रय, घर नं. २३, सहयोगनगर, रिजनल वर्क शॉपजवळ, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६७

सुनावणी दिनांक : १८.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. जयराम पोचीराम वने,<br>रा. राजवाडी, पो. मेंडका, तालुका मुदखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी : | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, मुदखेड, तालुका<br>मुदखेड, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | | :अनुपस्थित |

**आज रोजी प्रत्यक्षातः**

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | गट विकास अधिकारी, पंचायत<br>समिती, मुदखेड, तालुका मुदखेड,<br>जिल्हा नांदेड | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१ एप्रिल १९९३ ते ३१ मार्च २००९ या कालावधीतील जवाहर योजनेअंतर्गत मुदखेड तालुक्यामध्ये मंजूर करण्यात आलेल्या विहिरींच्या लाभार्थ्यांच्या नावागावासह व प्रस्तावांची काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १२.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी दिनांक ०८.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना मुदखेड तालुक्यातील लाभार्थ्यांच्या प्रस्तावाच्या आणि मोजमाप पुस्तिकांच्या प्रती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी दिनांक ३१.०८.२००९ रोजी काही माहिती दिली होती व उर्वरित माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०.०९.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांना देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती

घेण्याचे नाकारले. मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती शोधून काढण्याचे काम त्यांच्या स्तरावर संबंधितांकडून चालू आहे.

मागील सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात व्यापक व्याप्ती असलेली १६ वर्षांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस जवाहर योजनेअंतर्गत मुदखेड तालुक्यातील जवाहर विहिरींच्या खोदकामाची मोजमापे ज्या मोजमाप पुस्तिकेत घेतली त्या मोजमाप पुस्तिकाच्या प्रती व संबंधित लाभार्थ्यांचे प्रस्ताव अद्यापपावेतो अपिलार्थीस प्राप्त झालेले नाहीत. अपिलार्थीस आता द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. आज सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे आयोगासमोर कोणतीही बाब नव्याने सादर झालेली नाही. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिश: माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिश: व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. जयराम पोचीराम वने, रा. राजवाडी, पो. मेडंका, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१८

सुनावणी दिनांक १८.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बद्रीनाथ मारोती पठाडे,<br>रा. जिल्हा परिषद क्वॉर्टर, मोतीबागेजवळ, जालना | : अपिलार्थी : | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित (प्रतिनिधी- शाखा अभियंता) |

**आज रोजी प्रत्यक्षात :**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी : | उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | :उपस्थित (प्रतिनिधी- श्री. एन.डी. जोशी, कनिष्ठ अभियंता) |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०८.२००८ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागामार्फत सन २००६-०७ व २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये केल्या गेलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाच्या हजेरीपटाच्या प्रती, कामाचे नाव, कुशल व अकुशल कामावर झालेला खर्च, कामाची सद्यस्थिती, आणि भूसंपादनाची सद्यस्थिती - या मुद्यांशीसंबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५८,००० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व तदनंतर १५ दिवसात माहिती देण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २१.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे आणि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून अपिलार्थी त्यांच्याकडे उपस्थित न राहिल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीने ज्या उप अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती मागितली होती ते उप अभियंता आय. एन. राजपूत यांचे अपघाती निधन झाले आहे.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांना असे तोंडी आदेशित

करण्यात आले होते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून २० दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांनी दि. ०४.०८.२०१० रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती पाठविल्याचा आयोगासमोर युक्तिवाद केला. तथापि आज रोजी अपिलार्थी सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे याबाबतची आयोगास खात्री करता येऊ शकत नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थीस आता फक्त सन २००६-०७ व २००७-०८ या कालावधीत झालेल्या रोहयो कामांवरील मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती दाखवावयाच्या आहेत. सबब या कागदपत्रांच्या नस्ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाहाणीस्तव उपलब्ध करुन ठेवाव्यात. यासाठी कार्यालयीन कामकाजाचा दिवस निश्चित करुन अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सूचनापत्राद्वारे कळवावे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना व्यक्तिशः व विनामूल्य पाहाणीस्तव उपलब्ध करुन द्यावी, यासाठी कार्यालयीन कामकाजाचा दिवस निश्चित करुन अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सूचनापत्राद्वारे कळवावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. बद्रिनाथ मारोती पठाडे, रा. जिल्हा परिषद क्वॉर्टर, मोतीबागेजवळ, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६९

सुनावणी दिनांक १८.११.२०१०

१ श्री. दिलीप सी. जैन,(मुगदीया), : अपिलार्थी : :अनुपस्थित

संपादक, सा. झटका, सरदार पटेल रोड, चेलीपुरा,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी : :उपस्थित (प्रतिनिधी- श्री. वाय.व्ही.आवाळे, शाखा अभियंता)

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम

उपविभाग, वैजापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम

उपविभाग, वैजापूर, जि. औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद :उपस्थित

त्रयस्थ पक्ष : श्री. पवार, उपअभियंता :अनुपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते दि.१५.०६.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, वैजापूर यांच्याकडे केला होता. अपिलार्थीच्या या अर्जानुसार अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून या नंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४.०८.२००९ रोजी परत उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज उप अभियंता यांनी विनाकार्यवाही त्यांच्याकडे पाठविला होता. यानंतर अपिलार्थीने दिनांक २१.०९.२००९ रोजी या संदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे तक्रार केली असता, सदर तक्रार पाच महिन्यानंतर कार्यकारी अभियंता यांना प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीचा कथित प्रथम अपील अर्ज फेटाळून लावला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५.०१.२०१० रोजी स्पीड पोस्टाद्वारे माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत केले.

मागील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८ व १० शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण मुद्दा क्रमांक ७ व ८ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा अभिप्राय अपेक्षित करणारी व मोघम स्वरुपाची माहिती मागविली आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. परिणामी ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० अन्वये श्री. पवार, उपअभियंता यांच्या सन २००५ मध्ये दाखल केलेल्या संपूर्ण संपत्तीच्या विवरणपत्राची छायांकित प्रत मागितली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्ष यांच्या पूर्णपणे खाजगी बाबींशी संबंधित असून, ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल असे आयोगास वाटत नाही. परंतु त्रयस्थ पक्ष श्री. पवार उपअभियंता यांच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप मात्र होईल. परिणामी अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) चा भंग होईल. त्यामुळे ही माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ , ६, ९ व ११ शी संबंधित माहिती दिली गेल्याचे आयोगास आढळून येत नाही. या मुद्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, ही माहिती विभागीय स्तरावर ठेवली जात असते, असे कळविले आहे. याचा अर्थ संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ती उपलब्ध नव्हती किंवा ती त्यांच्या प्राधिकरणाचा दुसरा भाग असलेल्या प्राधिकरणाकडे उपलब्ध

होती, अशावेळी त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत त्या प्राधिकरणाकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थी हे त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्यावरील माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्याकरिता संबंधित उपअभियंता हे जबाबदार असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६, ९ व ११ शी संबंधित माहिती त्यांच्या प्राधिकरणाचा भाग असलेल्या संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकाऱ्यावर २५,०००/- रु. इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याचे नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. अपिलार्थीने हे उत्तरदायित्व या

प्रकरणी कशा प्रकारे पार पाडले आहे याचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर २५,०००/- रु. इतकी शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, मागील सुनावणीच्यावेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार त्यांनी दि. १०.११.२०१० रोजी स्पीड पोस्टाद्वारे अपिलार्थीस माहिती पाठविली आहे. यासंदर्भातील पोस्टाचा दाखला त्यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केला.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. दिलीप सी. जैन, (मुगदीया), संपादक : सा. झटका, सरदार पटेल रोड, चेलीपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७०

सुनावणी दिनांक : १८.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सय्यद करीम सय्यद अहेमद सौदागर,<br>रा. प्लॉट नं. ७, दिल्ली गेट, औरंगाबाद | : | अपिलार्थी | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, बी. एफ. सी. आय. स्कूल,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी | :अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (शिक्षण विभाग), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | | | |

**आज रोजी प्रत्यक्षात :**

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद :उपस्थित (प्रतिनिधी - श्री. वाय.एम.भूमे, कार्यालय अधीक्षक

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मुख्याध्यापक बी. एफ. सी. आय. स्कूल, दिल्ली गेट, औरंगाबाद यांच्याकडे, त्यांच्या शाळेविषयी दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे विविध विषयावर व्यक्तिशः माहिती मागितली होती. यानंतर अपिलार्थीच्या या अर्जानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २२.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.०९.२००९ रोजी

निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले आणि अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे संबंधित मुख्याध्यापकास सूचित केले. तथापि या कालावधीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या शाळेकडे माहितीची मागणी केली आहे, ती शाळा कायम स्वरुपी विनाअनुदानित आहे.

आज रोजी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१०.२००९ रोजी आवश्यक ती माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे पुरविली. तथापि या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील पार्किंगची व्यवस्था या मुद्यासंदर्भात संबंधित मुख्याध्यापकाने त्यांना कोणतीही माहिती दिली नाही. त्याचप्रमाणे सदर संस्थेच्या ऊर्दू व इंग्रजी या दोन माध्यमाच्या स्वतंत्र शाळा कार्यरत असून ऊर्दू माध्यमाच्या शाळेस शासकीय अनुदान मिळत आहे. यासंदर्भात आज सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीनेही या संस्थेच्या ऊर्दू माध्यमाच्या शाळेस अनुदान मिळत असल्याचे आयोगासमोर कबूल केले.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील ऊर्दू माध्यमाच्या शाळेविषयी माहिती संबंधित शाळेच्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात ज्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती मागविली आहे, त्या संस्थेच्या दोन शाळा असून त्यातील इंग्रजी माध्यमाची शाळा कायमस्वरुपी विनाअनुदानित असून त्या शाळेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे भरीव अर्थसहाय्य, प्रत्यक्षपणे व अप्रत्यक्षपणे प्राप्त होत नाही. त्यामुळे या संस्थेची इंग्रजी माध्यमाची शाळा, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण'या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. परिणामी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी संबंधित संस्थेला लागू होत नाहीत, तथापि या संस्थेच्या ऊर्दू माध्यमाच्या शाळेस शासनाकडून ६० टक्के अनुदान प्राप्त होत असल्याची बाब आज सुनावणीच्यावेळी स्पष्ट झाली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बी. एफ. सी. आय.ऊर्दू स्कूल, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील ऊर्दू माध्यमाच्या शाळेसंबंधीची माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. सय्यद करीम सय्य्द अहेमद सौदागर, रा. प्लॉट नं. ७, दिल्ली गेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बी. एफ. सी. आय.(ऊर्दू माध्यम)स्कूल, दिल्ली गेट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७१

सुनावणी दिनांक : १८.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी उध्दवराव पाटील,<br>नगरसेवक, वॉर्ड क्र. ६, नगर परिषद, मानवत,<br>मु. पो. मानवत, जि. परभणी | : | अपिलार्थी :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मानवत, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जि. परभणी | | : उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | लेखापाल, नगर परिषद, मानवत,<br>जि. परभणी | :उपस्थित<br>( प्रतिनिधी -<br>श्री. बोरेवाड शेषेराव<br>लालबा, भंडारपाल) |
| त्रयस्थ पक्ष | : | श्री. संतोष खडसे (न. पा. सदस्य) | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.११.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मानवत नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रातील त्रयस्थ पक्ष श्री. संतोष खडसे

यांच्या घर क्रमांक ८-२-८७ आणि नवीन बांधकाम क्रमांक ८-२-८९ व पायरीनाका जवळील बांधकामासंदर्भात काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती विनामूल्य हस्तांतरित केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २३.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद मानवत यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१.०८.२००९ रोजी निर्णय देऊन, या निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिनांक ०९.०९.२००९ रोजी दिली. सदर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील प्रत्येक मुद्याचा परामर्श घेऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०७.२०१० रोजी घेण्यात आली. या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते आणि त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. त्यावेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या बांधकामासंदर्भात माहिती मागितली आहे ते बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे झालेले नाही व तसेच त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८.०७.२००९ रोजी व प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

मागील सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात कागदपत्रांवरुन आयोगाचे अभिप्राय असे होते की, या प्रकरणी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४ व ५ याच मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. उर्वरित मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती आणि अपिलार्थीस देय असलेली माहिती याची तुलना करता, जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांनी ज्या बांधकामाच्या माहितीची मागणी केली आहे त्या बांधकामाच्या विषयासंदर्भातील लांबी व रुंदी अशी माहिती दिलेली नाही. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे संदर्भीत केलेले बांधकाम आणि लांबी व रुंदी हा नकाशा व अपिलार्थीने या नकाशाची प्रत (स्केल फूट) अपिलार्थीस द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे इमारतीची लांबी व रुंदी किती व नगर पालिकेने ही लांबी किती दाखविली आहे अशी माहिती मागविली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या बांधकामासंदर्भात माहिती मागविली आहे त्या बांधकामा-संदर्भातील अद्यापपावेतो नगर परिषदेने पूर्णतः प्रमाणपत्र दिलेले नाही. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. त्याचप्रमाणे अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे

व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी, असेही सूचित करण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, मागणी सुनावणीच्यावेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार त्यांनी अपिलार्थीस दि. १४.०७.२०१० रोजी टपालाद्वारे माहिती पाठविली आहे. त्यासंदर्भातील कागदपत्रे त्यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केली. आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे याबाबीची खात्री आयोगास करता आली नाही.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शिवाजी उध्दवराव पाटील, नगरसेवक वार्ड क्र. ६, नगर परिषद, मानवत, जि. परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, मानवत, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७२

सुनावणी दिनांक १८.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ए.ए.खान,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | : उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | १. उपअभियंता,जि.प. बांधकाम उपविभाग सिल्लोड | :उपस्थित |
| | | २.उपविभागीय अभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग औरंगाबाद | :अनुपस्थित |
| त्रयस्थ पक्ष | : | श्री. इमीडी, श्री. अनमोले | |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष, श्री. अनमोले व श्री. इमीडी या शाखा अभियंता व उपअभियंता यांनी सन २००७-०८ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद बांधकाम विभागाअंतर्गत केलेल्या कामांची माहिती, त्यांच्याकडून उचलण्यात आलेल्या पतमर्यादा, सी.पी.यु.एम. खर्च कोठे व कशा स्वरुपात करण्यात आला, यासंदर्भात संपूर्ण माहिती मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे (टपालाद्वारे की व्यक्तिशः) माहिती अपेक्षित आहे, याचा खुलासा केलेला नव्हता. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दिनांक ३१.०७.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.११.०९.२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस दि. २५.०९.२००९ पूर्वी परिपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतर अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०७.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने पतमर्यादेसंदर्भात माहिती मागितली आहे. तथापि जिल्हा परिषदेमध्ये कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांना पतमर्यादा मंजूर करावयाचे

अधिकार नाहीत. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सीपीयुएम म्हणजे काय, याचा अर्थ त्यांना न कळल्यामुळे ते अपिलार्थीस यासंदर्भात माहिती देऊ शकले नाहीत.

आज सुनावणीच्यावेळी प्रकरणात कोणतीही नवीन बाब आयोगासमोर मांडण्यात आलेली नाही.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाने केलेल्या कामासंदर्भात मागणी केलेली माहिती ही, मोघम स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाने सन २००७-०८ या आर्थिक वर्षात केलेल्या कामाची कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील, त्रयस्थ पक्षाने "केलेल्या कामाची माहिती" म्हणजे अपिलार्थीस निश्चित कोणत्या मुद्यावरील माहिती अपेक्षित आहे, याचा खुलासा अपिलार्थीने केलेला नाही. अपिलार्थीच्या अर्जातील संबंधितांना मंजूर केलेल्या पतमर्यादा, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील 'सी.पी.यु.एम.' या अक्षरसमुहाद्वारे अपिलार्थीस नेमके काय सूचित करावयाचे याचा अर्थबोध जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने अर्ज त्यांच्याकडे सादर केल्यानंतर झाला नव्हता व आजही त्यांच्याकडे अशाप्रकारची संज्ञा ते वापरत नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. त्यामुळे अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाला मंजूर करण्यात आलेल्या सन २००७-०८ या कालावधीतील पतमर्यादा, या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे, याचा खुलासा केला नसल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत

आहे की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून संबंधितांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील देय असलेली पतमर्यादेशीसंबंधित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : १८.११.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. ए.ए.खान,क्वालिटी फेब्रीकेशन मकसुद कॉलनी कॉर्नर,ए.के.ट्रेडर्ससमोर, कटकट गेट रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,जि.प. बांधकाम उपविभाग सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,जि.प. बांधकाम उपविभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७३

सुनावणी दिनांक १८.११.२०१०

१ श्री. सचिन भाऊसाहेब काकडे, : अपिलार्थी :अनुपस्थित

रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादीः

कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा :उपस्थित

कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता :उपस्थित

सा.बां.उपविभाग (प्रतिनिधी - श्री. व्ही. वाय. आवाळे, शाखा अभियंता)

वैजापूर,जि.औरंगाबाद

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग,औरंगाबाद यांच्याकडे, सा.बां.उपविभाग,वैजापूर यांच्या अधिनस्त असलेल्या कामासंदर्भात सन २००७-०८,

२००८-०९ व २००९-१० या कालावधीतील काही माहिती एकूण पाच मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये झालेल्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या व मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती, झालेल्या कामाची पाहणी करण्याकरिता सदर काम तालुका नकाशावर मार्क करुन देऊन त्याची प्रत, ही कामे इतर विभागाकडे असतील तर त्या विभागाची ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत, प्रत्येक रस्त्याच्या डब्बर खदानीचे चार्ट व रस्त्याचे काम करण्याअगोदरचा व काम झाल्यानंतरचा खडीच्या जाडीचा चार्ट आणि रोहयोमध्ये झालेल्या पूर्ण व अपूर्ण कामांची यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वैजापूर उपविभागाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(एक)च्या तरतुदीनुसार दि. १२.०६.२००९ रोजी या प्रकरणाशी संबंधित माहिती ज्या उपअभियंत्याशी संबंधित आहे, त्या उपअभियंत्याकडे पाठविला. त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने दि. १४.०७.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०९.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत मोजमापपुस्तिकेच्या प्रती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.प्रकरणात आज दि. १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे वकील,श्री. एस.एम.रुद्रे यांनी असा युक्तिवाद केला होता की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच प्रत्येक रस्त्याचे काम करण्याअगोदरचा व काम झाल्यानंतरचा खडीच्या जाडीचा चार्ट आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. ही माहिती त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याने संबंधितांच्यावर शास्ती लावण्यात यावी, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास विनंती केली होती.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला होता की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असून अपिलार्थीस दि. १९.०९.२००९ रोजी २१६१ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. अपिलार्थीस मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती (एकूण २६६ पृष्ठे) त्यांनी दि. २१.१२.२००९ रोजी अपिलार्थीस स्पीड पोस्टाने पाठविल्या आहेत. मात्र सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी या संदर्भात अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचा पुरावा, आयोगास सादर करु शकले नाहीत.

मागील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ मधील मोजमापपुस्तिकांच्या झेरॉक्स प्रती पूर्णतः, मुद्दा क्र. ३ शी संबंधित नाहरकत प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती, मुद्दा क्र. ४ मधील रस्त्याचे काम करण्याअगोदरचा व काम झाल्यानंतरचा खडीच्या जाडीचा चार्ट या मुद्यांवरील माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तालुका नकाशावर त्यांच्या उपविभागामार्फत केलेले काम दाखवून नंतर त्या नकाशाची

प्रत अपिलार्थीस देण्याचे सूचित केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती नव्याने तयार करुन नंतर ती अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ मधील रस्त्याचे काम करण्याअगोदरचा व काम झाल्यानंतरचा खडीच्या जाडीचा चार्ट, या विषयाची माहिती, अंदाजपत्रकामध्ये उपलब्ध आहे व अंदाजपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविल्या आहेत. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, या उपविभागामध्ये एकूण ३०१ कामे मंजूर असून त्यापैकी त्यांना फक्त १०४ अंदाजपत्रकांच्या प्रतीच प्राप्त झाल्या आहेत. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला आहे की, त्यांच्या उपविभागास सन २००७-१० या कालावधीमध्ये एकूण ११६ इतकीच कामे मंजूर झाली आहेत. यासंदर्भात वस्तुस्थिती स्पष्ट करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी नमूद केलेल्या कालावधीमध्ये त्यांच्या उपविभागाकरिता मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या रजिस्टरमधील कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या नसतील तर त्या अंदाजपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात रस्त्याचे काम करण्याअगोदरचा व काम झाल्यानंतरचा खडीच्या जाडीचा चार्ट, ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ मधील पूर्ण व अपूर्ण कामांची यादी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे (एकूण पृष्ठे १३) पुरविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याची पोचसही जन माहिती अधिकारी यांनी

आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती व अद्यापि त्यांना द्यावयाची राहिलेली माहिती, याचे स्पष्ट पृथक्करण करुन, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उपअभियंता,श्री. पवार यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल,त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कोणतीही नवीन माहिती सादर केली नाही.

वरील सर्व बाबी पाहता मागील सुनावणीच्या वेळी काढलेले निष्कर्ष विचारात घेऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम,प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग,वैजापूर यांचा खुलासा मागवून त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**(दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. सचिन भाऊसाहेब काकडे,रा.३८,अ, उर्जानगर,सातारा परिसर,आयप्पा मंदिराजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (सा.बां.)उपविभाग वैजापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७४

सुनावणी दिनांक: १८.११.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रमेश नारायण कदम,<br>रा. हस्सापूर, ता.भोकर,जि.नांदेड | : | अपिलार्थी : | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>माध्यमिक आश्रम शाळा भोकर,जि.नांदेड | : | प्रतिवादी : | :अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,<br>नांदेड | | | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.११.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या आश्रमशाळेसंदर्भात इ.स. १९९९ ते २००८ या कालावधीशी संबंधित एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'स्पीड पोस्ट' व 'व्यक्तिशः', अशा दोनही माध्यमाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याचे व माहिती अधिकाऱ्याने अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०७.२००९ रोजी जन

अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०८.२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत संबंधित जन माहिती अधिकाऱ्यास नियमानुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.०९.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्या शाळेत प्रत्यक्ष येऊन पाहून घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले किंवा कसे हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,नांदेड यांच्याकडे दि ०५.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकाऱ्याने दप्तर दिरंगाई कायदा, २००६ चा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई का करण्यात येऊ नये, असे विचारले व आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दि. १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा दहा वर्षे एवढा प्रदीर्घ कालावधी आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी माहिती मिळविण्यासाठी 'स्पीड पोस्ट' व 'व्यक्तिशः' अशा दोनही पर्यायांचा उल्लेख केला आहे.सबब अधिनियमातील कलम २ ञ (एक) व (दोन) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण

माहितीची नस्ती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत व्यक्तिशः व विनामूल्य पाहणीसाठी उपलब्ध करुन ठेवावी.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची नस्ती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत व्यक्तिशः व विनामूल्य पाहणीसाठी उपलब्ध करुन ठेवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. रमेश नारायण कदम,रा. हस्सापूर, ता.भोकर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,माध्यमिक आश्रम शाळा भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७५

सुनावणी दिनांक १८.११.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नारायण उत्तमराव मते,<br>रा.देवहिवरा,ता.घनसावंगी,जि.जालना | : अपिलार्थी : | :उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,घनसावंगी,<br>जि.जालना | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,घनसावंगी,<br>जि.जालना | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, जि.जालना | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जि.जालना | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील दि. ३१.०३.२००५ ते २७.०४.२००९ या कालावधीशी संबंधित मोसंबी फळझाडांना देय असलेल्या विविध योजनांतर्गत अनुदानासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७,५००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, त्यांनी सदरचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २१.०५.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा प्रयत्न केला असता, संबंधित अधिकाऱ्याने चलन घेण्यास व पैसे भरुन घेण्यास नकार दिला असल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले व अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०७.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८.११.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील व आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पंधरा दिवसांच्या आत सशुल्क देण्याचे आयोगासमोर कबूल केले.तर अपिलार्थीने त्यांना शुल्क भरण्याबाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे शुल्काची रक्कम भरली नाही, असा युक्तिवाद केला.

दोनही सुनावणीच्यावेळी दोनही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. २८.०४.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७,५००/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा करण्याबाबत संभ्रम निर्माण झाला, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा करण्याची तयारी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही दर्शविली नाही. अशा परिस्थितीत अपिलार्थीस आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी शुल्क भरुन संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी अथवा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांना आवश्यक त्या माहितीशी संबंधित नस्तीचे निरीक्षण हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करुन त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सशुल्क हस्तगत करुन घ्याव्यात. हे दोन पर्याय अपिलार्थीस देऊ केले असता, अपिलार्थीने मात्र ते आजही बँकेत चलनाद्वारे शुल्क भरुन माहिती स्वीकारण्यास तयार असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले.

उपरोक्त दोन्ही सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस

तपासणीसाठी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेले कागदपत्रे याच कालावधीमध्ये सशुल्क उपलब्ध करुन द्यावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक १८.११.२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. नारायण उत्तमराव मते, रा.देवहिवरा, ता.घनसावंगी, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५४

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजू शिवलिंग पिल्लेवार,<br>शिवलिंग निवास, राजेंद्रनगर, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक वनसंरक्षक (जंकासं) कार्यालय,<br>किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, एप्रिल २००५ ते जून २००९ पर्यंत किनवट तालुक्यातील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात रोजगार हमी योजनेअंतर्गत सी. सी. टी., सी. सी. जी., सी. बी. एस. रोपयोजना व लागवड योजना अंतर्गत केलेली कामे यांसदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासनाकडून आलेला एकूण निधी, यावर झालेला खर्च, पूर्ण व अपूर्ण कामांची संख्या, या कामावर ठेवण्यात आलेल्या मजूरांना दिलेली एकूण मजूरी, मजुरांची यादी व शासनाकडून आलेली मंजुरी व वाटप करण्यात आलेली मजुरी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०९-२००९ रोजी माहिती पुरविल्याचे त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रावरुन त्यांना आढळून आले असल्याचे आयोगास स्पष्ट केले. तथापि आयोगाने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिका-याने अपिलार्थीस पुरविलेली माहिती अवलोकनार्थ मागितली असता, अशा प्रकारची कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, उपस्थितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पीड पोस्टाव्दारे माहिती मागितली होती. त्यामुळे अपिलार्थीने माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचा कोणताही प्रश्न नव्हता. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००९ रोजी निर्णय दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०९-२००९ रोजी विनामूल्य माहिती नेण्याबाबतचे दिलेले पत्र जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण ४३ पृष्ठांची माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे, तथापि सदरचे पत्र म्हणजे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात माहिती पुरविली असा त्याचा अर्थ होत नाही. कारण अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या-कडे स्पीड पोस्टाव्दारे माहिती मागितली आहे. या प्रकरणी अपिलार्थीचा प्रथम अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क

कळविणे संबंधित माहिती अधिका-यास अनिवार्य होते. परंतु त्यांनी अशी कृती केली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस कथित माहिती पुरविल्याचे कागदोपत्री दाखविले. प्रत्यक्षात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे कोणत्याही कागदपत्राआधारे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही असा निष्कर्ष काढण्यात येऊन, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत स्पीड पोस्टाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १०-०६-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), किनवट यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले असल्यामुळे मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिनांक २५-०९-२००९ रोजी स्पीड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरविली आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत स्पीड पोस्टाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

२. मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १८-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजू शिवलींग पिल्लेवार, शिवलींग निवास, राजेंद्रनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकासं), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५५

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

१ श्री. एस. एस. जाधव, : अपिलार्थी : अनुपस्थित
पटेलनगर, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी :
तथा प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय,
धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : अनुपस्थित
तथा प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय,
धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उप प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांना अद्यापपावेतो कोणत्याही स्वरुपाची माहिती दिली नसल्याने व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली गेली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या महाविद्यालयाच्या उप प्राचार्याचे पद भरण्यासंदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्दयांव्दारे व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कुठल्याच स्वरुपाची माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, लालबहादुर शास्त्री

महाविद्यालय, धर्माबाद यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०३-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय लिखीत स्वरुपात पारीत न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्या महाविद्यालयामध्ये प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी दिनांक १६-०७-२००९ रोजी अपिलार्थीस दूरध्वनी करुन अपिलार्थीस माहिती घेण्यासाठी त्यांच्या कक्षामध्ये बोलाविले असता, अपिलार्थीने ते त्यावेळी संपावर असल्याकारणाने महाविद्यालयात येऊ शकत नाहीत असे त्यांना उत्तर दिले. अपिलार्थीने दिनांक ०३-०८-२००९ रोजी प्रथम अपील केल्यानंतर प्राचार्यांनी संस्थेकडून माहिती मागवून नंतर ती अर्जदारास पुरविण्याचे आश्वासित केले. त्यावेळी अपिलार्थीने ते आयोगाकडे व्दितीय अपील सादर करणार नाहीत असे कळविले. परंतु तरीही त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. त्यांनी आयोगास त्यांच्या लेखी निवेदनाव्दारे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे संस्थेला माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करुन वेळोवेळी अर्ज करुन, वेळोवेळी अपील करुन संस्थेची व कर्मचा-यांची पिळवणूक करीत आहेत आणि त्यांच्या नियमीत कार्यात अडथळे आणत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आता तयार असून ते ती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत.

दिनांक ०३-०७-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आलेल्या गोष्टी, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद यांनी केलेला युक्तिवाद व या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस स्वतः होऊन जन माहिती अधिकारी यांच्याशी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात संपर्क साधणे गरजेचे होते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने अशा प्रकारचा प्रयत्न केल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. सुनावणीच्या वेळी प्राचार्यांनी अपिलार्थीच्या कथित वर्तनाबाबत त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये बरेच भाष्य केले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अपिलार्थीचा माहिती मागण्याचा हेतू अथवा

माहिती मागण्यामागची प्रवृत्ती लक्षात घेऊन केवळ अपिलार्थीच्या कथित वर्तनाबाबत त्यांना माहिती नाकारणे हे योग्य होणार नाही. कारण त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस देण्यासाठी तयार केलेली माहिती प्राचार्यांनी आयोगास दाखविली. या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास सकृतदर्शनी आढळून येत आहे. अपिलार्थीस प्राचार्यानी दूरध्वनी केला व त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात व अपील अर्जासंदर्भात काही सूचना केल्या असे प्राचार्यांचे म्हणणे आहे. तथापि त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ कोणताही ठोस पुरावा त्यांना आयोगाकडे सादर करता आला नाही. ही बाब लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहिती, वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून संबंधितांकडून हस्तगत करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. ही माहिती अपिलार्थीच्या प्राधिकृत प्रतिनिधीस देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रावर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत डाकेव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १८-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एस. एस. जाधव, पटेलनगर, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद,

तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५६

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सखाराम रघुनाथराव कुलकर्णी,<br>दत्तविला, स्वयंवर मंगल कार्यालय रोड,<br>सरपंचनगर, नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष | : श्रीमती जी. जी. आबलकवार (वरिष्ठ लिपीक) | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती जी. जी. आबलकवार (वरिष्ठ लिपीक), सार्वजनिक बांधकाम मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड यांच्या सेवाकाळाविषयी त्यांच्या नियुक्तीपासून ते दिनांक १३-०४-२००९ पर्यंतच्या कालावधीशी संबधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाच्या नियुक्तीचा दिनांक व ज्या पदावर नियुक्त झाली त्या पदाचे पदनाम, नियुक्तीच्या वेळी त्रयस्थ पक्षाची शैक्षणिक पात्रता , नियुक्तीच्या पदाच्या शैक्षणिक पात्रतेच्या असलेल्या अटी, त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र व उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादच्या

दिनांक १७-०४-१९९६ च्या आदेशाप्रमाणे नवीन गठीत करण्यात आलेली जात पडताळणी समिती, नाशिक यांनी चौकशी केलेला अहवाल - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १५-०४-२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याच्या कारणावरुन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०८-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०७-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस नांदेड मंडळाकडे माहिती देण्यासाठी कळविले होते, त्यामुळे त्यांच्या कार्यालयातील कोणतीही माहिती देणे अपेक्षित नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ पक्ष श्रीमती जी. जी. आबलकवार (वरिष्ठ लिपीक) यांनी जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन नियुक्ती व पदोन्नती मिळविली आहे, त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवाराची संधी डावलली गेल्याने असे प्रकरण उघडकीस आल्याने केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तीची त्यांच्याकरिता राखीव ठेवलेल्या पदावर नियुक्ती व पदोन्नती होण्यास मदत होईल या सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये नाशिक येथील जात पडताळणी समितीने या प्रकरणात केलेल्या चौकशी अहवालाची प्रत प्राप्त झालेली नाही. नाशिक येथे जात पडताळणी समितीने त्रयस्थ पक्षाची जात तपासणी केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही असे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती उपलब्ध असल्याचा पुरावा म्हणून अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना दिनांक ३०-०४-९६ रोजी दिलेल्या पत्राची प्रत आयोगास दाखविली व या पत्रासोबतच्या सहपत्राच्या प्रतीची त्यांना

आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले. या पत्राच्या सहपत्रामध्ये प्रमाणपत्र तपासणी समितीच्या आदेशाची प्रत (नाशिकच्या आदेशाची प्रत) असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस दिनांक ०६-०५-२००९ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उघड करु नये. कारण अपिलार्थी केवळ त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने ही माहिती मागवत असतात आणि त्यांना वारंवार ब्लॅकमेल करत असतात व ही माहिती उघड झाल्याने त्यांच्या जीवितास धोका होऊ शकतो. त्यांच्या जीवितास कशा प्रकारे धोका होऊ शकतो हे त्यांना आयोगास स्पष्ट करता आले नाही.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्या दिनांक ३० एप्रिल १९९६ च्या अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राबरोबरचे नाशिक येथील जात प्रमाणपत्र तपासणी समितीच्या आदेशाची प्रत अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून येत आहे. ही प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचा सबळ पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे सादर केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता त्रयस्थ पक्षाने त्यांचे आक्षेप नोंदविले असले तरी, या माहितीचे स्वरुप पाहता आणि विशेषत: जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे त्रयस्थ पक्षाने मिळविलेल्या नियुक्ती व पदोन्नती करुन घेतली आहे ही बाब नजरेआड करुन चालणार नाही. त्रयस्थ पक्ष या शासकीय सेवेत कार्यरत आहेत. त्यांना नियमीतपणे मिळणारे वेतन हे जनतेच्या करातून सार्वजनिक प्राधिकरणास प्राप्त होणा-या उत्पन्नातून अदा केले जाते, हे पाहता, ही माहिती उघड करण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, त्यांनी दिनांक ०३-०७-२०१० रोजी सुनावणीत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे दिनांक ३०-०४-१९९६ रोजीच्या पत्रासोबत जोडलेल्या पत्राच्या प्रती अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२०१० रोजी नोंदणीकृत डाकेने पाठविल्या आहेत. आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १८-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सखाराम रघुनाथराव कुलकर्णी, दत्तविला, स्वयंवर मंगल कार्यालय रोड, सरपंचनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५७

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. घायाळ अशोक केरबा,<br>जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळगांव,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तलाठी, तलाठी कार्यालय, सजा अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आजतागायत कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलली माहिती त्यांना विनामूल्य मिळावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कागदपत्रे पाहण्यासाठी नाकारले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे अंबाजोगाई येथील सर्वे नं. १०३/पठार-२५, ७/१२ नोंद व एन. ए. दंडाची रक्कम म्हणून जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली रक्कम रुपये ७००० ज्या पावतीव्दारे शासनाकडे जमा केली त्या शासनास भरलेल्या चलनाची प्रत, दंडाची रक्कम भरलेल्या चलनाची फोटो प्रत, कॅशबुकच्या नोंदीची फोटो प्रत, अशी माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती दिली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-११-२००८ रोजी

निर्णय देऊन, अपिलार्थीस पोस्टाने माहिती दिली असली तरीही परत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत तहसीलदार, अंबाजोगाई यांच्या आदेशाप्रमाणे दिनांक १५-११-२००८ रोजी पूर्वीचीच माहिती (दिनांक १८-०९-२००८ रोजीची) परत दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी आणि त्यांचे भाऊ एकाच शाळेत शिक्षक असून जन माहिती अधिकारी यांचे भाऊ शिक्षक सहकारी पत संस्थेचे संचालक आहेत. अपिलार्थीने या संस्थेस कर्ज मागितले असता त्यांचे कर्ज प्रकरण मंजूर करण्याकरिता अपिलार्थीने या प्रकारची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली रक्कम मूळात अपिलार्थीने त्यांच्याकडे कधीही दिली नाही. एन. ए. दंडाची रक्कम तलाठ्याकडे न भरता हा दंड तहसील कार्यालयात भरावा लागतो व तशी माहिती त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे व नंतर परत दिनांक १५-११-२००८ रोजी विनामूल्य दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये त्यांच्याकडे वेळोवेळी भरलेल्या पावत्याची मागणी केल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने खरोखरच ही रक्कम तलाठी, सजा अंबाजोगाई यांच्याकडे भरली आहे किंवा कसे यासंदर्भातील इतर कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद, की अपिलार्थीने मूळात त्यांच्याकडे ७/१२ उता-याप्रीत्यर्थ, दंडाप्रीत्यर्थ कोणतीही रक्कम भरली नसल्याचा त्यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे. अशा प्रकारे या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे काल्पनिक आणि अमूर्त स्वरुपातील माहिती मागितल्याचे येथे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात असलेली माहिती त्यांनी अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अस्तित्वात नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १८-११-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. घायाळ अशोक केरबा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळगांव, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५८

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मो. फरजान मो. इब्राहिम,<br>द्वारा- मुसा देशमुख, नुर कॉलनी, हेड पोस्ट ऑफीससमोर, जुना बाजार, औरंगाबाद | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे, सर्व शिक्षण अभियानाअंतर्गत जून २००९ मध्ये उर्दू माध्यमाच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणासंदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडून दिनांक १६-०७-२००९ रोजी घेऊन जावी असे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या प्रमाणे कृती न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८-०७-२००९ रोजी जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी दिनांक २६-१०-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००९ रोजी व्यक्तिशः माहिती हस्तांतरीत केली. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी कधीही नाकारले नाही. अपिलार्थीस प्रथमतः त्यांनी दिनांक १०-०७-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिनांक १६-०७-२००९ रोजी माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले होते. तथापि यावेळी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी देखील त्यांच्या दिनांक १२-१०-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००९ रोजी माहिती देऊ केली होती. तथापि अपिलार्थी त्या दिवशी माहिती घेण्याकरिता उपस्थित झाले नाहीत. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१०-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००९ रोजीच आवश्यक ती माहिती दिली व अपिलार्थीस सर्व माहिती मिळाल्याची पोच घेतली. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस सर्व माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती संपूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील त्यांनी कोणत्या कारणास्तव केले आहे, त्या कारणाचा उल्लेख द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे जी त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-१०-२००९ रोजी व्यक्तिशः व विनामूल्य पुरविली असून, ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडे त्यांची पोचसही देखील दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणताही अभिप्राय नोंदविला नाही अथवा या मुद्यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थितही नाहीत. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील

अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आढळून येत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कोणतीही नवीन बाब आयोगासमोर आली नसल्याने मागील सुनावणीचे निष्कर्ष कायम करण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक १८-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मो. फरजान मो. इब्राहिम, द्वारा- मुसा देशमुख, नुर कॉलनी, हेड पोस्ट ऑफीस-समोर, जुना बाजार, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५९

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अरुण रघुनाथ गायके,<br>मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय,<br>कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय,<br>कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | उपस्थित |

प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | सचिव, रेल नावडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. रेल नावडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : उपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष | : | रेल नावडी विविध कार्यकारी सोसायटी | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष रेल नावडी विविध कार्यकारी सहकारी संस्थेने केलेल्या कर्ज वाटपासंदर्भात सन २००८-०९ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा माहितीसाठीचा अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड यांच्याकडे केला होता. तथापि त्यावेळी सहकारी संस्थेचे सचिव यांची सहकार विभागाने माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केली असल्यामुळे, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार सहायक निबंधकांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक ०६-०७-२००९ रोजी संबंधित संस्थेच्या सचिवांकडे पाठविला. यानंतर संस्थेच्या सचिवांनी माहिती न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १४-०८-२००९ रोजी

सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ३१-०८-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे संस्थेच्या सचिवांना सूचित केले. तथापि या नंतरच्या कालावधीमध्ये देखील माहिती उपलब्ध न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आणि संबंधित संस्थेचे सचिव व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड या आयोगासमोर उपस्थित होत्या. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी संबंधित संस्थेच्या सचिवांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता त्यांच्या सोबत आणली असून, ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष रेल नावडी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्यावेळी माहितीसाठीचा मूळ अर्ज केला त्यावेळी संबंधित संस्थेचे सचिव हे माहिती अधिकारी होते. तथापि मध्यंतरीच्या कालावधीमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने माहिती अधिकार अधिनियम हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या कोणत्याही संस्थेला लागू होणार नाही असा निर्णय रिट याचिका क्रमांक ३६४८/२००७, श्री. बालाजी को. ऑप. स्पिनिंग मिल्स लि. रिसोड, जिल्हा वाशिम विरुध्द राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर या संदर्भात दिनांक ०२-०३-२००९ रोजी दिला आहे. यानंतर परत मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या औरंगाबाद खंडपीठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक १३०४/२००८, जळगांव जिल्हा अर्बन को. ऑप. बँक्स असोसिएशन लि. जळगांव विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर यासंदर्भात दिनांक १७-०२-२००९ रोजी दिलेल्या आदेशान्वये सहकारी संस्थचे वार्षिक ताळेबंद व नफा तोटा पत्रक वगळता इतर कोणत्याही मुद्यावरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासाठी मनाई हुकुम जारी केला आहे. सबब सहायक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर औरंगाबाद खंडपीठाकडील निर्णय अंतिम होईपर्यंत सदरचे प्रकरण सुप्त प्रतिक्षाधीन (Dormant) ठेवावे असे सूचित करण्यात येत आहे व अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०७-२००९ रोजीच्या पत्रान्वये

माहितीपोटीचे शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे कळविले होते. परंतु शुल्काची रक्कम कळविली नव्हती. त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०८-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनाशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि या आदेशावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही त्यामुळे अपिलार्थीने दिनांक ०३-११-२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले. सदर व्दितीय अपिलावर दिनांक ०५-०७-२०१० रोजी सुनावणी झाली. दरम्यान दिनांक ०५-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविली परंतु ती परत आली कारण अपिलार्थीने सदर माहिती घेण्यास नकार दिला.तथापि वर नमूद केल्याप्रमाणे दि. ०५.०७.२०१० रोजीच्या सुनावणीमध्ये आयोगाने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे घेतलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १८-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अरुण रघुनाथ गायके, मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, रेल नावडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. रेल नावडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६१

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रुपचंद चुनिलाल गांधी,<br>मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रधानमंत्री (सचिव), श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये प्रधानमंत्री (सचिव), श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा यांच्याकडे, त्यांच्या संस्थेसंदर्भात दिनांक ०१-०१-२००४ ते १०-०७-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी त्यांच्या संस्थेला लागू नसल्याने त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे कळविले. तसेच अपिलार्थीस ते संबंधित संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी असल्याची जाणीव करुन दिली आणि त्यांना आवश्यक असलेली माहिती ते कार्यालयीन वेळेत येऊन पाहू शकतात असे त्यांना अवगत केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७-०८-२००९ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्तांनी दिनांक ०७-१०-२००९ रोजी निर्णय देऊन सचिव, अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५-०७-२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सचिव, अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ व सहायक धर्मादाय

आयुक्त यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. सदर प्रकरण आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियम संबंधित संस्थेला लागू आहे. कारण संबंधित संस्था जरी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाअंतर्गत मंजूर झाली असली तरी या संस्थेच्या शाळांना नियमितपणे शासनाचे अनुदान प्राप्त होत असते.

संबंधित संस्थेच्या सचिवांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्या संस्थेचे उपाध्यक्ष असून, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अजाद्वारे मागणी केलेली माहिती दिनांक ११-११-२००९ व ११-०६-२०१० रोजी पूर्ण स्वरुपात पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या प्रकरणी अपिलार्थीने मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सार्वजनिक न्यासाच्या सचिवांच्याकडे त्यांच्या संस्थेविषयी काही माहिती मागविली होती. तथापि या संदर्भातील प्रथम अपील त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे केले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधित असणे गरजेचे आहे. कारण अधिनियमातील कलम १९ (१) मध्ये जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी असावे असे नमूद केले आहे. या प्रकरणी संबंधित संस्थेचे सचिव आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांच्यामध्ये वरिष्ठ कोण हे संबंधित अधिकारी एकाच प्राधिकरणाशी संबंधित असल्याशिवाय निश्चित करता येणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयापुरते जन अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहू शकतात. जर अपिलार्थीने ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे मागितली असती तर अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे अपील करणे योग्य राहिले असते. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या पध्दतीचा चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील करुन भंग केला असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी आयोगासमोर असलेली वस्तुस्थिती विचारात घेता सदर निष्कर्ष अंतिम करण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( दी. बा. देशपांडे )** |
| **दिनांक १८-११-२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१ श्री. रुपचंद चुनिलाल गांधी, मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा प्रधानमंत्री (सचिव), श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६२

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. घाटुळे जगन खंडू,<br>रा. जवळगाव, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक, वेतन पथक प्राथमिक विभाग,<br>जिल्हा परिषद, बीड | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>बीड | : | अनुपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष : श्री. देशमुख, श्री. मोरे एन. ई. | : | अनुपस्थित |
| | श्री. भोसले, श्री. मगर | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या जी.पी.एफ. संदर्भात एकूण ५ मुद्यांव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्ष श्री. भोसले, श्री. मगर व श्री. देशमुख यांच्यासंदर्भातील माहितीचा देखील समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दि.२५.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुख्याध्यापक, नेताजी सुभाषचंद्र प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई यांच्याकडून मागविण्यात आली असून ती प्राप्त होताच अपिलार्थीच्या अर्जावर कार्यवाही करण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.१०.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील

कलम १९(६) द्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणात दिनांक ०५-०७-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. भोसले, श्री. देशमुख, श्री. मोरे एन. ई उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष श्री. मगर अनुपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण वाटण्याचे कारण अपिलार्थीस विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील " ...................... जी.पी.एफ.नंबर दिला पण मला का दिला नाही" व मुद्दा क्र. २ मधील, "मी प्रशिक्षित असून त्यांच्याप्रमाणे मला भविष्य निर्वाह निधी नंबर द्यावा" या मुद्यांवरील माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटत आहे,असे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित होती व काही माहिती मुख्याध्यापक, नेताजी सुभाषचंद्र बोस, प्राथमिक विद्यालय,अंबाजोगाई यांच्याशी संबंधित असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वेळ लागला. अपिलार्थीस त्यांनी दि.१६.११.२००९ रोजी माहिती दिली. अपिलार्थीच्या सेवा या मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे नियमित केल्या असून मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीच्या सेवा दि. १६.०३.२००८ पासून नियमित केल्या आहेत. अपिलार्थीच्या पगारातून त्यांच्या शाळेने प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम त्यांच्या वेतनातून वजा करुन ती, 'निलंबित लेखा'(Suspense Account) या शीर्षाखाली कोषागारात जमा केली आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद न देता, या कलमातील विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर मुख्याध्यापक, नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय,अंबाजोगाई यांच्याकडे उपलब्ध होती तर त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे, सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार देणे त्यांना गरजेचे होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही व अपिलार्थीस दि. १६.११.२००९ रोजी माहिती पुरविली. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी न घेता या अपील

अर्जावर त्यांचा दि. १२.०१.२०१० रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.११.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली असल्याने अमान्य केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती अपिलार्थीस अपूर्ण वाटण्याचे कारण अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मुद्यावरील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून,"............. मला का दिला नाही. ............" या मुद्यावरील माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांना ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे, खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या निर्णयाबद्दलची अथवा कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या मुद्यावर माहिती प्राप्त झाली नाही, असे वाटत आहे, त्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,"मी प्रशिक्षित असून त्याप्रमाणे मला भविष्य निर्वाह निधी नंबर द्यावा" अशाप्रकारची माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकणार नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वत:चे, ते प्रशिक्षित असल्याचे मत नोंदवून त्यांना जी.पी.एफ नंबर देण्याची जन माहिती अधिकाऱ्यास विनंती केली आहे. अशाप्रकारची विनंती, हा माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' चा विषय होऊ शकत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहितीचे देखील अपिलार्थीस अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे कारण निकालात निघत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि अपिलार्थीचे मूळ गाऱ्हाणे लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात त्यांना शिक्षण विभागाची भूमिका स्पष्ट करणारी एखादी टिपणी पुरविल्यास अपिलार्थीच्या शंकांचे निरसन होऊ शकेल, असे आयोगास वाटते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस या टिपणीची प्रत द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व सर्व संबधितांनी केलला युक्तिवाद यांचा ऊहापोह करता असे दिसून येते की, अपिलार्थीची मागितलेली माहिती ही त्यांच्या व त्यांच्या सहका-यांची संलग्न असून भविष्य निर्वाह निधीचा क्रमांक व त्यामधील प्रतिमहा पगारातून कपात केलेली रक्कम याबाबतची आहे. ही माहिती प्रत्येक अधिकारी / कर्मचा-याला

त्यांच्या कार्यालयाकडून मिळणे अभिप्रेत आहे. सबब अपिलार्थीने विचारलेल्या माहितीतील प्रश्नार्थक स्वरुपातील विचारलेली माहिती वगळून खालीलप्रमाणे माहिती द्यावी.

श्री. घाटुळे जगन खंडू, श्री. भोसले, श्री. मगर, श्री. देशमुख व श्री. मोरे एन. ई यांच्या सन २००८ पासून आजपर्यंत भविष्य निर्वाह निधीच्या पावत्याच्या प्रती त्यावर भविष्य निर्वाह निधी क्रमांक व कपात केलेली रक्कम इत्यादीचा तपशील द्यावा. अपिलार्थी यांनी सन १९९३ पासून शिक्षक म्हणून काम केलेले आहे त्यामुळे त्यांच्या भविष्य निर्वाह निधी कपात तपशील याबाबत शोध घेणे अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे सन २००५ पासून अपिलार्थीस शिक्षकसेवक या कंत्राटी पदावर ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या पूर्वीच्या सेवेचा त्यांचा तपशील देण्यास बाधा होऊ नये. श्री. भोसले, श्री. मगर, श्री. देशमुख व श्री. मोरे एन. ई या सर्व जणांच्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या जून २००५ च्या पुढील अपिलार्थीस द्याव्यात. श्री. मोरे यांच्या शैक्षणिक झेरॉक्स प्रती द्याव्यात. महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी क्रमांक दिलेली टिपणीची झेरॉक्स प्रत द्यावी. जून २००८ ते डिसेंबर २००८ या सात महिन्याची रुपये १००० प्रमाणे कपात केल्याच्या पोच पावत्या व ज्या खात्यावर जमा केल्या आहेत तो नंबर तसेच त्याच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात. मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस मिळालेली आहे. तसेच दिनांक १६-११-२०१० ला काही माहिती पुरविली तथापि ती संदिग्ध आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. वरीलप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने व विनामूल्य पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती विनामूल्य आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १८-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. घाटुळे जगन खंडू, रा. जवळगाव, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६४

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. इकबाल अहेमद वासिफोद्दीन,<br>बडकेअली, घर नं. ५, खुलताबाद,<br>तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य<br>वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य<br>वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष | : दर्गा कमेटी हद्दे खुर्द, खुलताबाद | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,"दर्गा कमिटी हद्दे खुर्द खुलताबाद,जि. औरंगाबाद यांचे वक्फ बोर्डामध्ये रजिस्ट्रेशन केले अथवा नाही, केले असेल तर नकलेची पूर्ण सत्यप्रत अथवा केले नाही तर लेखी स्वरुपात द्यावे" अशी सन १९६० ते दि. ०१.०७.२००९ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती त्यांना कोणत्या माध्यमाद्वारे अपेक्षित आहे, यासंदर्भात त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ,औरंगाबाद यांच्याशी संबंधित नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या दि. ०७.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली व त्यांना

अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने परत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिला नाही. तथापि त्यांच्या कार्यालयाच्या दि. १६.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे माहिती अधिकाऱ्यास सूचित केले. परंतु या नंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५.०७.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी दर्गा कमिटी हद्दे खूर्द, खुलताबाद यांची औरंगाबाद येथील वक्फ बोर्डाकडे नोंदणी झाली असल्यास, त्या नोंदणीपत्राची प्रत, ही माहिती वगळता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती देय होत नाही. कारण उर्वरित मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर समितीचे वक्फ बोर्डाकडे रजिस्ट्रेशन केले आहे किंवा कसे, अशा अर्थाची माहिती विचारली आहे व केले नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्याची विनंती केली आहे. यामधील संदर्भित दर्गा कमिटीची नोंदणी वक्फ बोर्डाकडे झाली आहे किंवा कसे, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक अभिप्राय मागितली आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी दर्गा कमिटी,खुलताबाद या संस्थेची वक्फ बोर्डाकडे नोंदणी झाली असल्यास नोंदणी आदेशाची प्रत व झाली नसल्यास सदर कमिटीची नोंद झाली नाही, अशा अर्थाची माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०७.०७.२००९ रोजीच्या पत्रातील आदेशाप्रमाणे व तदनंतर दि. १६.०९.२००९ रोजीच्या त्यांच्या प्रथम अपील अर्जाद्वारे निर्णय देऊनही कोणतीही कार्यवाही न करुन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद हे अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत

आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध कागदपत्रांवर अवलंबून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, दर्गा कमिटी हद्द ए खूर्द,खुलताबाद या संस्थेची वक्फ बोर्डाकडे नोंदणी झाली असल्यास नोंदणी आदेशाची प्रत व झाली नसल्यास सदर कमिटीची नोंद झाली नाही, अशा अर्थाची माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक १८-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. इकबाल अहेमद वासिफोद्दीन, बडकेअली, घर नं. ५, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की,औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६५

सुनावणी दिनांक १८-११-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख सादिक शेख जलिल,<br>सरदारनगर, किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>नांदेड | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे जुलै,२००९ मध्ये भरती केलेल्या परिचर या पदाच्यासंदर्भात, ओपनचे मेरिट किती, बैठक क्र. २३४१३ ला किती मार्क मिळाले, उत्तरपत्रिकेची झेरॉक्स आणि प्रश्नपत्रिकेची झेरॉक्स, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीने याच माहितीकरिता दि. ०५.०९.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दिनांक १८-११-२०१० रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिलेले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ती त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी आज रोजी सोबत आणलेली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की,या प्रकरणाशी संबंधित सहायक जन माहिती अधिकारी श्री. एल.जी.कुलकर्णी यांनी या प्रकरणी केलेल्या अनियमिततेमुळे त्यांना दि. २७.०८.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे निलंबित करण्यात आले असून त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात आली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत भरती करण्यात आलेल्या परिचरांपैकी निवड झालेल्या परिचरांना मिळालेले गुण आणि बैठक क्रमांक २३४१३ मधील उमेदवाराला प्राप्त झालेले गुण आणि प्रश्नपत्रिका व त्यांच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स, अशी माहिती मागितली होती. यापैकी बैठक क्र.२३४१३ च्या उत्तरपत्रिकेची प्रत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणार नाही, कारण राज्य माहिती आयोगाने अशाप्रकारची माहिती उघड न करण्याबाबत वेळोवेळी वेगवेगळया प्रकरणांमध्ये भूमिका घेतली आहे. या प्रकरणी देखील हीच भूमिका आयोग कायम ठेवत आहे. परिणामी अपिलार्थीस त्यांच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणार नाही. परंतु त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होऊ शकेल. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे अपिलार्थीचे होते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशा प्रकारचे उत्तरदायित्त्व कशाप्रकारे पार पाडले आहे, याचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही व तसेच यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याबरोबर आणलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेल्या संपूर्ण माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास

आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली,देय माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सादर केले की, त्यांनी अपिलार्थीस आयोगाकडील दिनांक ०५-०७-२०१० रोजीच्या सुनावणीतील निर्देशानुसार दिनांक ०७-०७-२०१० रोजी माहिती पुरविलेली आहे. तसेच याबाबत अपिलार्थीस माहिती मिळाल्याबाबत त्यांच्याकडे पोच आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित नाहीत तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक १८-११-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख सादिक शेख जलिल, सरदारनगर, किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.